

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

सेतू अभ्यास

(Bridge Course)

विषय - मराठी

इयत्ता - पाचवी

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू अभ्यास (ब्रिज कोर्स) : इयत्ता पाचवी

- **प्रवर्तक** : **शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन**
- **प्रकाशक** : **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**
- **प्रेरणा** : **मा. वंदना कृष्णा, (भा.प्र.से.)**
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा.विशाल सोळंकी, (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक (भाषा व समता विभाग)**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  नीता जाधव, उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे, विषय सहायक, मराठी विभाग,**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती गटप्रमुख** : **डॉ. राजेश बनकर, वरिष्ठ अधिव्याख्याता ,**
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे
- **निर्मिती सदस्य** : **१) नितीन मेमाणे, विषय सहायक,**
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे
  २) नरेंद्रकुमार रायकर, पदवीधर शिक्षक,
  जि. प. प्राथ. शाळा रौंधळवाडी, ता. खेड, जि. पुणे
  ३) वर्षाराणी जाधव , सहायक शिक्षक
  जि. प. प्राथ. शाळा गोसासी, ता. खेड, जि. पुणे
  ४) वैशाली डेरे, सहायक शिक्षक
  कै.मामासाहेब मोहोळ विद्यामंदिर,म.न.पा.शाळा क्र.९४बी,पुणे

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो, मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. **या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हे उद्दिष्ट ठेवून तुमच्यासाठी हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

1. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे.
2. हा सेतू अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवावा.
3. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात.
4. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या.
5. सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून यामध्ये १५ व्या दिवशी पहिली ३० व्या दिवशी दुसरी व ४५ व्या दिवशी तिसरी याप्रमाणे तीन चाचण्यांचा समावेश आहे.
6. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या. शेवटी दिलेल्या उत्तरसूचीच्या मदतीने आपल्या उत्तरांची खात्री करा.
7. चला सराव करू या व सक्षम बनू या यामधील कृती मध्ये अडचण आल्यास, न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर अभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'**, त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या',** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने अधिक चिकित्सक विचार करावा, सर्जनशील व्हावे, अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे.
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ. ची मदत घ्यावी.

- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधी नंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवावे याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरील सेतू अभ्यास हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाइन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक मित्र यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढील इयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- वयानुरूप समकक्ष वर्गातील मुलांसाठी SCERT मार्फत तयार केलेल्या **विद्यार्थी मित्र** व **शिक्षक मार्गदर्शिका** यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा .
- या सेतू अभ्यासात दिलेल्या अध्ययन कृती या मार्गदर्शक असून शिक्षक आपल्या वर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन संदर्भात इतर आवश्यक त्या कृती घेऊ शकतात.

सेतू अभ्यासच्या अंमलबजावणी व वापराकरिता आपणास हार्दिक शुभेच्छा !

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू अभ्यासक्रम कृती आराखडा

इयत्ता – पाचवी **विषय – मराठी** **कालावधी – ४५ दिवस**

➢ उद्दिष्टे

१.कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.

२.विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.

३.विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.

४.विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.

५.विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

➢ अपेक्षित क्षेत्र /कौशल्य

1. **मौखिक भाषा विकास (श्रवण ,भाषण -संभाषण)**
2. **भाषाभ्यास (कार्यात्मक व्याकरण)**
3. **वाचन**
4. **लेखन**

अनुक्रमणिका

दिवस	संकल्पना	पृष्ठ क्रमांक	दिवस	संकल्पना	पृष्ठ क्रमांक
१	गोष्ट ऐकून प्रश्न विचारणे	1	२४	चित्रावरून गोष्टलेखन	32 व 33
२	मुलाखत	2	२५	मुद्द्यांवरून गोष्ट लेखन	32 व 35
३	प्रसंग वर्णन	3	२६	सूचनाफलक	36 व 37
४	प्रकट वाचन	4	२७	निमंत्रणपत्रिका वाचन	38
५	बातमी वाचन	5	२८	उतारा वाचन	39 व 40
६	विनोद वाचन	6	२९	माहितीपर वाचन	41
७	कविता वाचन	7	३०	**चाचणी क्रमांक -२**	42 व 43
८	प्रश्न निर्मिती	8	३१	कथावाचन	44
९	नाट्यीकरण	9	३२	शब्दशोध पाटी वाचन	45
१०	अनुभव कथन	10	३३	कोडी	46
११	स्वल्पविराम	11व 12	३४	समानार्थी शब्द	47 व 48
१२	प्रश्नचिन्ह	13	३५	जोडशब्द	49 व 50
१३	उद्गारवाचकचिन्ह	14	३६	म्हणी	51 व 52
१४	मूकवाचन	15	३७	वाक्प्रचार	53
१५	**चाचणी क्रमांक -१**	16 व 17	३८	संवादवाचन	54
१६	जाहिरात वाचन	18 व 19	३९	वचन	55
१७	क्रियापदाचा लेखनात वापर	20 व 21	४०	अनुभव लेखन	56
१८	स्वल्पविरामाचा लेखनात वापर	22 व 23	४१	निबंध लेखन	57
१९	प्रश्नचिन्हाचा लेखनात वापर	24 व 25	४२	निमंत्रणपत्रिका लेखन	58 व 59
२०	सूचनाफलक वाचन	26 व 27	४३	संवादलेखन	60 व 61
२१	श्रुतलेखन	28	४४	कल्पनाविस्तार	62
२२	एका शब्दाचे दोन अर्थ	29	४५	**चाचणी क्रमांक -३**	63
२३	प्रत्यय लावून शब्द	30 व 31	-	-	-

१

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र-मौखिक भाषा विकास **कौशल्य/क्षमता - श्रवण ,भाषण** **संकल्पना-गोष्ट ऐकून प्रश्न विचारणे**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.01 इतरांकडून सांगितली जाणारी गोष्ट लक्षपूर्वक ऐकून त्यावर आपले मत व्यक्त करतात व प्रश्न विचारतात.

05.01.01 ऐकलेल्या,वाचलेल्या साहित्यातील विषय,घटना,चित्र,पात्र व शीर्षक याबाबत प्रश्न विचारतात आपले मत देतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या परिसराशी, वातावरणाशी संबंधित, विद्यार्थ्यांचे भावविश्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना आवडेल अशी एक छानशी गोष्ट सांगावी. गोष्ट सांगताना शिक्षकांनी योग्य कृती आरोह,अवरोह यांचा वापर करावा जेणेकरून गोष्ट प्रभावीपणे सादर होईल.

उदा. इसापनीती, अकबर-बिरबल, रामायण, महाभारतातल्या गोष्टी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ऐकलेल्या गोष्टीवर निरनिराळे प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी अधिक दृढीकरणासाठी विद्यार्थ्यांना आणखी एक गोष्ट सांगावी. गोष्ट ऐकून गोष्टीवर आधारित प्रश्न कसे तयार करावेत हे समजून सांगावे.

उदा. १) ह्या गोष्टीतून तुम्हाला कोणता बोध मिळाला ?

२) गोष्टीतील कोणते पात्र तुम्हाला सर्वात जास्त आवडले ?

त्याचबरोबर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गोष्टीवर आधारित विद्यार्थ्यांना सुचलेले प्रश्न इतरांना विचारण्यास सांगावे.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची गोष्ट सांगण्याची संधी द्यावी. इतर विद्यार्थ्यांना गोष्टीवर आधारित प्रश्न विचारण्यास सांगावे.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्याव्यात.

1) **हुशारी, धाडसीपणा, लोभी, प्रामाणिकपणा, अशा प्रकारे वेगवेगळ्या बोध देणाऱ्या गोष्टी शोधून त्यांचे वाचन करा व त्या इतरांना सांगा.**
2) **गोष्ट वाचल्यानंतर त्यातील कोणते गुण आपल्याला आत्मसात करणे गरजेचे आहे असे तुम्हाला वाटते ?**

२

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- मौखिक भाषा विकास **कौशल्य/क्षमता –श्रवण,भाषण,संभाषण** **संकल्पना-मुलाखत**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.04 स्वत:चे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात.

05.01.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग,घटना इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करतात त्यावर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात प्रश्न विचारतात

जाणून घेऊ या

शिक्षकांनी वर्गातील कोणत्याही दोन विद्यार्थ्यांना उभे करावे. पहिल्या विद्यार्थ्यास दुसऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या सवयी, आवडीनिवडी याविषयी प्रश्न विचारण्यास सांगावे. प्रश्न विचारण्यासाठी शिक्षकांनी आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

सक्षम बनू या

- **कोणत्याही व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी कशाप्रकारची तयारी करावी लागते,कोणकोणते प्रश्न विचारावेत, प्रश्न विचारताना आवाजातील चढ-उतार,हावभाव कसे असावे याविषयी शिक्षकांनी स्पष्टीकरण करावे.**
- **शिक्षकांनी मुलाखत कशी घेतात ते एका विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन दाखवावे.**
- **एका शिक्षकाची मुलाखत या प्रकारांतर्गत शिक्षकांनी त्यांची स्वत: ची मुलाखत घेण्यास सांगावे.**
- **वर्गातील इतर मुलांनाही प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.**

सराव करू या

शिक्षकांनी दोन दोन मुलांचे गट करून त्यांना विषय ठरवून द्यावा व एकमेकांची मुलाखत घ्यायला सांगावे.

कल्पक होऊ या

१.तुमच्या गावाच्या सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या शिपायाची मुलाखत घ्या.

२.टीव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या मुलाखती पाहा व त्यात कशाप्रकारे प्रश्न विचारले जातात ते समजून घ्या.

३

इयत्ता- पाचवी विषय-मराठी

क्षेत्र-मौखिक भाषा विकास कौशल्य/क्षमता –भाषण- संभाषण संकल्पना-प्रसंग वर्णन

अध्ययन निष्पत्ती-

04.01.05 विविध प्रकारचे साहित्य यामध्ये आलेल्या नैसर्गिक सामाजिक तसेच इतर बाबी संवेदनशीलतेने समजून त्यांवर चर्चा करतात.
05.01.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग,घटना इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करतात त्यावर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात प्रश्न विचारतात.

जाणून घेऊ या



शिक्षकांनी वरील चित्राबाबत चर्चा करावी. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे व प्रश्न विचारावे. जसे की. १) हे चित्र कशाचे आहे ? २) चित्रातील मुले काय करत आहेत? ३) या चित्रातून आपल्याला कोणता संदेश मिळतो ? ४) चित्र पाहून चित्राविषयी एक घोषवाक्य सांगा. त्यानंतर शिक्षक विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून वर्गातील विद्यार्थ्यांना चित्राचे वर्णन करण्यास सांगतील. शिक्षक मोजक्या शब्दात चित्राचे वर्णन करतील.

सक्षम बनू या



शिक्षकांनी प्रसंग चित्राचे विद्यार्थ्यांना निरीक्षण करायला सांगून चित्राचा विषय ,वेळ ,व्यक्ती ,ठिकाण या गोष्टींचा संदर्भ घेऊन विद्यार्थ्यांना निरनिराळे प्रश्न विचारावे. १) हे चित्र कोणत्या ठिकाणाचे आहे ? २) अशा गर्दीच्या ठिकाणी तुम्ही कोणती काळजी घ्याल ? ३) कोरोनाच्या परिस्थितीचा विचार करता या चित्रात कोणत्या सुधारणा कराव्या लागतील ?
शिक्षकांनी अशाप्रकाचे आणखी प्रश्न विचारावेत. चर्चा झाल्यानंतर दोन तीन विद्यार्थ्यांना चित्राचे वर्णन त्यांच्या शब्दात करण्यास सांगावे.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करावे. प्रत्येक गटाला उपलब्ध असलेले एक चित्र देऊन चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.गटातील मुलांनी एकमेकांशी चर्चा करून प्रसंग वर्णनाचे सादरीकरण करावे . शिक्षकांनी प्रत्येक गटास सादरीकरणाची संधी द्यावी.

कल्पक होऊ या

१.तुम्ही आत्तापर्यंत अनुभवलेला चांगला / वाईट अनुभव आपल्या मित्राला सांगा.

२. आठवडे बाजार, बस स्थानक, जत्रा अशी ठिकाणे तू पाहिली आहेत काय त्या ठिकाणचे वर्णन आठव आणि मित्राला सांग.

४

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **कौशल्य / क्षमता- वाचन** **संकल्पना - प्रकट वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.10 वाचलेल्या रचनांमधील मुख्य विषय, घटना,चित्र ,पात्र ,शीर्षक यासंबंधी चर्चा करतात.प्रश्न विचारतात.आपले मत व्यक्त करतात .प्रश्न विचारतात,आपले मत व्यक्त करता,आपले म्हणणे पटवून देतात.

05.01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी (फलकावरील सूचना.कार्य अहवाल,माहिती मिळविण्यासाठी) वाचतात,लिहितात.

जाणून घेऊ या

चार ओळी लिहिल्यास,त्यात किती चुका ! अक्षरसुद्धा किती गचाळ !“

“मला सारे असेच म्हणतात .अक्षर सुधारण्यासाठी काय करावे .हे मात्र कोणी सांगत नाही .”

“सांगते ना. रोज फक्त पाच ओळी लिहित जा.”

“एवढेच ना ?“

“अरे ,त्या नुसत्याच उतरवायच्या नाहीत .त्यासाठी मन एकाग्र करून लिही .सावकाश लिही .प्रत्येक अक्षर वळणदार आलं पाहिजे .लिहिताना अशुद्ध लिहीत नाही ना,यावर लक्ष ठेव.”

“मी रोज व्यायाम करतो,उजळणी म्हणतो,पाठांतर करतो,तसेच हे देखील नियमाने करीन .सुधारेल ना माझं अक्षर ?”

“नक्की सुधारेल. “

शिक्षकांनी मुलांना वरील उताऱ्याचे ठराविक वेळेत वाचन करण्यास सांगावे.समजपूर्वक वाचन झाले कि नाही हे तपासण्यासाठी उताऱ्यावर आधारित काही प्रश्न विचारावेत .शिक्षक विद्यार्थी वाचन करत असताना पुढील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करतील.

१)आवाजातील बदल (चढ – उतार) २)विरामचिन्हाचा विचार करून वाचन

३) चेहऱ्यावरील हावभाव ४)पुस्तक पकडण्याची पध्दत ५) शब्दांचा शुद्ध व स्पष्ट उच्चार

सक्षम बनू या

शिक्षकांनी मुलांच्या प्रकटवाचनाचे निरीक्षण केल्यानंतर वरील उताऱ्याचे आदर्श प्रकटवाचन करून दाखवावे .आदर्श प्रकटवाचन कसे असावे याबाबत चर्चा करावी .उता-यात आलेल्या विरामचिन्हांचा अर्थ सांगावे.त्यानुसार अर्थपूर्ण वाचन कसे करावे हे सांगतील . शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध उतारे वाचनास उपलब्ध करून द्यावेत.

सराव करू या

१.इ. ४ थी पाठ्यपुस्तकातील पान नं.२ वरील पाठ २ बोलणारी नदी या पाठाचे प्रकटवाचन करून घ्यावे व त्यावर आधारित प्रश्न विचारावेत

२.विरामचिन्ह असलेले उतारे किंवा गोष्टींची पुस्तके देऊन प्रकटवाचनाचा सराव करून घ्यावा.

३.पुढील शब्द मोठ्याने वाचण्यास सांगावे . आशीर्वाद ,अभयारण्य ,स्फूर्ती ,आत्मभान , सत्याग्रह, स्वयंपाक,ख्रिसमस ,सर्वत्र ,ग्लास, वल्हवा

कल्पक होऊ या

१) गटामध्ये उपलब्ध असलेली वर्तमानपत्रातील निवडक उतारे प्रकटवाचनास द्यावे.

२) इ,४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं – ६४ वरील उतारा वाचण्यास द्यावा. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून लिहिण्यास सांगावे.३) आवाजात चढ-उतार असलेली वाक्य शोधण्यास सांगावी. **उदा. “ योग्य भाव ? पाच पैसे लागतील.घ्यायचं असेल तर घे नाहीतर चालू लाग.**

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

५

क्षेत्र – वाचन **कौशल्य /क्षमता- वाचन,** **संकल्पना - बातमी वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक ,प्रसिद्धीफलक इ.) यांचे समजपूर्वक वाचन करतात

05.01.06 आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्र ,बालसाहित्य ,मोठेफलक इ.)समजून घेऊन वाचतात.

जाणून घेऊया

शिक्षक विद्यार्थ्यांस पुढील बातमीचे वाचन करण्यास सांगतात.व बातमीवर आधारित काही प्रश्न विचारतात

प्रश्न : शेजारील बातमी वाचून प्रश्नाची उत्तरे सांगा.

१)वरील बातमी कोणत्या वर्तमानपत्रातील आहे?

२) ही बातमी कोणत्या ठिकाणची आहे ते सांगा

३)वरील बातमी कशा संदर्भात आहे?

४)वरील बातमीतील फोटो कोणी काढला आहे?

५)या बातमीतून तुम्हाला घुबड या पक्ष्याविषयी कोणती माहिती मिळते?



जखमी घुबड वन विभागाकडे सुपूर्द

लोकसत्ता वृत्तविभाग

कळवण : शहराजवळील कोल्हापूर फाटा येथील प्रगतशील शेतकरी मोतीराम शिंदे आणि नीलेश शिंदे यांच्या शेतात जखमी अवस्थेत घुबड पक्षी दिसून आल्यावर त्यांनी त्यास वन विभागाच्या ताब्यात दिले.

नीलेश शिंदे यांनी घुबडाला उचलून घेत त्याची पाहणी केली. घुबडाच्या डोळ्याला गंभीर इजा झाल्याचे दिसले. नीलेश यांनी भ्रमणध्वनीव्दारे महाराष्ट्र निसर्ग आणि पर्यावरण संस्थेचे सदस्य विकास भोरत यांना ही घटना सांगितली.

भोरत यांनी वन विभागाचे अधिकारी पंकज देवरे यांच्याशी संपर्क साधला. देवरे हे तत्काळ त्या शेतात पोहचले. जखमी घुबडाला ताब्यात घेऊन प्रथमोपचारसाठी कळवण येथे घेऊन गेले. देवरे यांनी ही गव्हाण घुबड असून तिचे पंख एक फुटाच्या आसपास तर, तिची मान ३६० अंश सेल्सिअसपर्यंत फिरू शकते, अशी माहिती दिली.

कळवण येथील मोतीराम आणि नीलेश शिंदे यांच्या मळ्यात आढळलेले जखमी घुबड

(छाया- डॉ. किशोर पुवर)

सक्षम बनू या

शिक्षक मुलांना वरीलप्रमाणे विविध बातम्यांचे नमुने वाचनासाठी उपलब्ध करून देतात.बातमी वाचताना पुढील मुद्द्यांचा विचार करावा हे विद्यार्थ्यांना स्पष्ट करतात.

- प्रथम बातमीचे शीर्षक वाचून बातमी कशासंदर्भात आहे हे जाणून घ्यावे.
- बातमी कोणत्या ठिकाणची आहे हे पाहावे,
- बातमी कोणत्या वर्तमानपत्रातील आहे ?
- बातमी कोणी दिली आहे?
- बातमीत फोटो असेल तर तो बातमी संदर्भात आहे का ते पाहावे

सराव करू या

शिक्षकांनी मुलांकडून पुढील बातमी वाचून घ्यावी व चर्चा करावी

पुणे महापालिकेने तयार केली ऑक्सिजनची लायब्ररी

पुणे जिल्ह्यातील 442 ग्रामपंचायती कोरोनामुक्त

शीर्षकांचे प्रकट वाचन करण्यास सांगावे..

कल्पक होऊ या

शिक्षकांनी मुलांकडून पुढील कृती करून घ्यावी .

१)तुमच्या शाळेत झालेल्या वृक्षरोपणाची बातमी तयार करा.

२)वर्तमानपत्रातील खेळा संदर्भातील बातम्यांची कात्रणे जमा करा आणि वाचून दाखवा

६

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **कौशल्य /क्षमता- वाचन** **संकल्पना - विनोद वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.06 वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव याची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी/ लेखी स्वररूपात व्यक्त करतात.

05.01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी वाचतात व लिहितात.

जाणून घेऊया

वाचा

रुग्ण :माझा एक दात खराब झाला आहे.
डॉक्टर :त्या जागी आपण दुसरा दात बसवूया.
रुग्ण : दात मात्र माझ्या दातासारखा हवा.
डॉक्टर :ते शक्य नाही.
रुग्ण :का ?
डॉक्टर :एवढे घाणेरडे दात माझ्याकडे नाहीत.

शिक्षकांनी अशाप्रकारचे विनोद मुलांना वाचण्यास द्यावे. विनोद समजला कि नाही,यासाठी शिक्षकांनी प्रश्न विचारावेत.

१) हा संवाद कोणामध्ये चालू आहे?

२) रुग्णाला दुसरा दात का बसवायचा आहे ?

३)डॉक्टर रुग्णाचा दात बसवायला का नाहीम्हणाले?

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरीलप्रकारचे विविध विनोद मुलांना योग्य चढ उतारासह वाचून दाखवावे .शिक्षकांनी विनोद निवडताना मुलांच्या वयाचा विचार करून निवडावा. वाचलेला विनोद मुलांना समजून सांगावा. विनोदी लेखन वाचल्याने आपल्या चेहऱ्यावर हास्याचे भाव येतात.तसेच आपले मनोरंजन होते व आपल्याला आनंद मिळतो. हे विद्यार्थ्यांना सांगावे.

सराव करू या

१) शिक्षकांनी मुलांचे ३ -४ मुलांचे गट त्यांना इ ४ थी वही च्या पाठ्यपुस्तकातील पान नं. २१ ,४५ ,८१ वरील विनोदी लेखन वाचण्यास द्यावे

२) शिक्षकांनी खालील प्रकारचे चित्रविनोद मुलांना उपलब्ध करून द्यावेत. व त्याचे वाचन घ्यावे.

३)तुमच्या सोबत घडलेला एखादा विनोदी प्रसंग आठवून सांगा.



कल्पक होऊ या

१)शिक्षकांनी वर्तमानपत्रात येणारी विनोदाची कात्रणे कापून वहीत चिकटवण्यास सांगावे

२)मुलांनी वाचलेले विनोद एकमेकांना सांगण्यास सांगावे

७

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **कौशल्य /क्षमता- वाचन** **संकल्पना - कविता वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.08 वेगवेगळ्या साहित्यरचनेत आलेल्या नवीन शब्दाचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

04.01.10 वाचलेल्या रचनेमधील मुख्य विषय ,घटना,चित्र,पात्र, शीर्षक यांसंबधी चर्चा करतात.प्रश्न विचारतात,आपले मत व्यक्त करतात,आपले म्हणणे पटवून देतात.

05.01.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी साहसी,सामाजिक विषयावरील कथा कविता इ .) विषय घटना ,चित्र ,पात्र , व शीर्षक याबाबत चर्चा करतात प्रश्न विचारतात,आपले मत देतात,तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कवितेचे काळजीपूर्वक वाचन करण्यास सांगावे.व कवितेवर आधारित प्रश्न विचारावेत.प्रश्नामध्ये विविधता असावी.

देवा तुझे किती | सुंदर आकाश
सुंदर प्रकाश | सूर्य देतो
सुंदर चांदण्या | चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर | पडे त्याचे

सुंदर वेलींची | सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले | देवा तुझी
इतुके सुंदर | जग तुझे जर
किती तू सुंदर | असशील !

सुंदर ही झाडे | सुंदर पाखरे
किती गोड बरे | गाणे गाती

प्रश्न : पुढील प्रश्न काळजीपूर्वक वाचा व अचूक उत्तरे द्या .

१)ही कविता कोणत्या विषयावर आहे?३)गोड गाणी कोण गातात?

२)सुंदर जग पाहून कवी कोणती कल्पना करतो? ४)हे जग कोणी निर्माण केले आहे , असे कवीला वाटते?

५)"पक्षी"या शब्दाचा कोणता समानार्थी शब्द कवितेत आला आहे?

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध प्रकारच्या कवितांचे वाचन करून घ्यावे.कविता काळजीपूर्वक व आशय समजून घेऊन वाचण्यास सांगावी. कवितेतील शब्दांच्या अर्थाकडे लक्ष देण्यास सांगावे.काही कवितांचे ताला- सुरात गायन करून दाखवावे.कवितेच्या कवींची ओळख करून द्यावी .कवितेत आलेल्या नवीन शब्दांकडे लक्ष देण्यास सांगावे.

सराव करू या

१)शिक्षकांनी मुलांना इ.४ थी च्या पाठ्यपुस्तकातील कविता ११.नाखवादादा,नाखवादादा.....वाचण्यास त्यावर प्रश्न विचारावेत

२)शिक्षकांनी पुढील कृती करून घ्यावी .

पुढील प्रसंगी तुम्ही काय कराल ते सांगा- थंडीने गारठून गेल्यावर

कल्पक होऊ या

१)गारा,वारा,धारा,मारा ....हे शब्द वाचून पावसावर४ ते ५ ओळी स्वत: मुलांना कविता बनविण्यास सांगावी.

८

इयत्ता- पाचवी **विषय**-मराठी

क्षेत्र- मौखिक भाषा विकास **कौशल्य/क्षमता** -भाषण-संभाषण **संकल्पना**- प्रश्न निर्मिती

अध्ययन निष्पत्ती-

04.01.10 . वाचलेल्या रचनांमधील मुख्य विषय,घटना,चित्र,पात्र,शीर्षक यासंबंधी चर्चा करतात. प्रश्न विचारतात आपले मत व्यक्त करतात

05.01.01 ऐकलेल्या वाचलेल्या साहित्यातील विषय,घटना,चित्र,पात्र याबाबत चर्चा करतात प्रश्न विचारतात आपले मत देतात.

जाणून घेऊ या

शिक्षक विद्यार्थ्यांना 'धरतीची आम्ही लेकरं ' या कवितेचे वाचन करून दाखवतील. विद्यार्थ्यांना कवितेवर आधारित प्रश्न विचारण्यास सांगतील .प्रश्न विचारताना शिक्षक विद्यार्थ्यांना आवश्यक तेथे मार्गदर्शन करतील.

सक्षम बनू या

शिक्षक विद्यार्थ्यांना कवितेचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्न कसे तयार करावेत व त्या प्रश्नांची उत्तरे कशी लिहावीत याविषयी मार्गदर्शन करतील. शिक्षक उदाहरणदाखल दोन /तीन प्रश्न तयार करून दाखवतील.

१. प्रथम कवितेचे शांतपणे वाचन करावे .

२. कवितेतील अपरिचित शब्द /समानार्थी शब्द शोधावे.

३. कवितेचा विषय समजून घ्यावा .

४. कवितेत आलेले ठिकाण ,प्रसंग ,वेळ ह्या बाबी समजून घ्याव्यात .

५. कवितेत कवीला काय सांगायचे आहे ते समजून घ्यावे .

शिक्षक दृढीकरणासाठी आणखी एका कवितेचा सराव घेतील.

सराव करू या

१. शिक्षक विद्यार्थ्यांना पुस्तकातील 'झुळूक मी व्हावे ' या कवितेवर आधारित प्रश्न तयार करून लिहिण्यास सांगतील.

२.कवितेतील एका ओळीवर एकापेक्षा जास्त प्रश्न तयार करता येतील का? ते प्रत्यक्ष करून पाहा.

कल्पक होऊ या

शिक्षक विद्यार्थांना पाठ्यपुस्तकाबाहेरील एका कवितेचे वाचन करण्यास सांगतील. त्यावर आधारित निरनिराळे प्रश्न तयार करण्यास सांगतील.

९

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- मौखिक भाषा विकास **कौशल्य/क्षमता - भाषण-संभाषण** **संकल्पना-नाट्यीकरण**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.04 स्वतःचे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात.

05.01.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग,घटना इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करतात त्यावर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात प्रश्न विचारतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील एक प्रसंग देऊन त्या प्रसंगावर गटात एकमेकांशी चर्चा करण्यास सांगावे.. चर्चेला वेळ दिल्यानंतर एका गटाला एका संवादाचे सादरीकरण करण्यास सांगावे.

उदा. पुस्तक विकणारा आणि विद्यार्थी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य तिथे मार्गदर्शन करावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रसंग समजावून सांगितल्यानंतर दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांना सादरीकरण करण्याची संधी द्यावी. तसेच योग्य त्या ठिकाणी मार्गदर्शन करून संवाद अजून कशाप्रकारे वाढवता येईल किंवा रंजक बनवता येईल याविषयी सांगावे. वर्गातील दोन-दोन विद्यार्थ्यांचे गट करून सर्व विद्यार्थ्यांना सादरीकरणाची संधी द्यावी

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना "कोरोना काळात घेतलेली स्वतःची स्वच्छतेची काळजी" हा विषय देऊन चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा व नंतर गटांचे सादरीकरण घ्यावे. योग्य त्या ठिकाणी मार्गदर्शन करावे.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील विषयांचे सादरीकरण करण्यास सांगावे.

१) तुमच्या मित्रांचा एक गट बनवून सामाजिक विषयावर छानसे नाट्यीकरण करा.

उदा. १) वृक्षारोपण २) पाण्याची बचत ३)व्यायामाचे महत्त्व

२) तुम्हाला कोणकोणत्या समस्या येतात व त्या तुम्ही कशा सोडवता याविषयी छोटेसे नाट्यीकरण करा.

३. तुम्ही व तुमची लहान बहिण मिळून बाबांचा वाढदिवस कसा साजरा कराल.याचे नाट्यीकरण सादर करा.

१०

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- मौखिक भाषा विकास **कौशल्य/क्षमता - भाषण-संभाषण** **संकल्पना-अनुभव कथन**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.04 स्वत:चे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात.

05.01.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग,घटना इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करतात त्यावर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात प्रश्न विचारतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एखादा प्रसंग /घटना /कृतीवर आधारित निरनिराळे प्रश्न विचारावे, विचारलेल्या प्रश्नांशी संबधित विद्यार्थ्याला त्याचे अनुभवकथन करण्यास सांगावे. शिक्षकांनी योग्य तेथे मार्गदर्शन करावे.

उदा. १. आपल्या शाळेत साजरा झालेला स्वातंत्र्यदिन

२. अचानक आलेला पाऊस

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अनुभव कथन करताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे ते स्पष्ट करावे. शिक्षकांनी स्वत: एक अनुभवकथन करून दाखवावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खेळ,सण, दैनंदिन जीवनातील प्रसंग,शालेय उपक्रम यांसारखे विषय देऊन प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:च्या शब्दांत ५/६ वाक्यात आपले अनुभव कथन करण्याची संधी द्यावी. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन करावे.

सराव करू या

शिक्षकांनी निरनिराळे विषय असणाऱ्या चिठ्ठ्या तयार कराव्यात. प्रत्येक विद्यार्थ्यांस एक चिठ्ठी उचलून त्यात असलेल्या विषयावर ५/६वाक्ये बोलण्यास सांगावे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करावे. विद्यार्थ्यांना एकमेकांचे अनुभव गटात सांगण्यास सांगावे.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कृती करण्यास सांगावे.

१. तुम्ही एकट्याने केलेला प्रवास याविषयी तुमचे अनुभव सांगा.

२. तुमची आत्तापर्यंत कधी फजिती झाली आहे का ? त्या प्रसंगाचा अनुभव सांगा

११

इयत्ता- पाचवी विषय-मराठी

क्षेत्र-भाषाभ्यास कौशल्य/क्षमता -विरामचिन्हे संकल्पना-स्वल्पविराम

अध्ययन निष्पत्ती-

04.01.17 - विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा (पूर्णविराम,अल्पविराम,प्रश्नचिन्ह इत्यादी) जाणीवपूर्वक वापर करतात.

05.01.10 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक(उदा.विरामचिन्ह,काळ,क्रियापद,लिंग,वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

05.01.11 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी , हे चिन्ह दाखवून या चिन्हाला काय म्हणतात हे विद्यार्थ्यांना विचारावे. शिक्षकांनी स्वल्पविराम असलेली काही वाक्य विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावे व त्यात कोणते चिन्ह लिहावयाचे राहिले ते विचारावे .

1.तांदूळ गहू ज्वारी बाजरी ही तृणधान्ये आहेत.

२. महाराज मला क्षमा करा.

3. नाही मी हे काम करणार नाही.

सक्षम बनू या

शिक्षकांनी स्वल्पविराम असलेली काही वाक्य फळ्यावर लिहावीत. व त्या वाक्यांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे. वाक्यांमध्ये स्वल्पविराम कोठे वापरला आहे याची विद्यार्थ्यांशी चर्चा करावी .या वाक्यात कोणते चिन्ह असते याविषयी विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करावी .

स्वल्पविराम वाक्यांमध्ये केंव्हा केव्हा वापरतात हे शिक्षकांनी उदाहरणे देऊन स्पष्ट करावे.स्वल्पविराम चिन्हाचा वापर करून दाखवावे व विद्यार्थांकडून करून घ्यावे .आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे .

उदा. १.एका जातीचे अनेक शब्द

२. छोटे छोटे वाक्य असल्यास

३.संबोधनाचे वेगळेपण दाखवण्यासाठी

४.हो,नाही यासारख्या शब्दांनी वाक्य सुरू झाल्यास

उदा. १.महेश,उमेश,गणेश,रमेश व सुरेश हे माझे मित्र आहेत.

२.सोहम,आपण घरी जाऊ.

३.हो,मी त्याला सांगितले.

सराव करू या	कल्पक होऊ या
शिक्षकांनी स्वल्पविराम नसलेली वाक्ये विद्यार्थ्यांना द्यावीत त्याचा वैयक्तिक व गटात सराव करून घ्यावा. (अ) पुढील वाक्ये वाचा व त्यात योग्य विरामचिन्ह लिहून वाक्य पुन्हा लिहा. 1. आमच्या बागेत आंबा चिकू पेरू ही फळझाडे आहेत. 2. विद्यार्थी मित्रांनो उद्या शाळेला सुट्टी आहे. ३. अनिलला मराठी गणित विज्ञान हे विषय आवडतात. (आ). पुढीलपैकी कोणत्या वाक्यात स्वल्पविराम आला आहे ते ओळखा व ते वाक्य पुन्हा लिहा. 1.माझ्या देशावर माझे प्रेम आहे. २.पण नदी कशी बोलणार? ३.माधवने कोबी,मटार,भेंडी,पालक,मुळा ह्या भाज्या आणल्या.	शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कृती करायला सांगावे. १..बागेतील किंवा इतर ठिकाणावरील सूचनांमध्ये स्वल्पविराम असलेली वाक्ये लिहा. २.दररोजच्या बोलण्यामध्ये ज्या वाक्यामध्ये स्वल्पविराम असतो अशी पाच वाक्य लिहा.

SCERT MAHARASHTRA

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

१२

क्षेत्र- भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता - लेखन** **संकल्पना- प्रश्नचिन्ह**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.17 - विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा (पूर्णविराम,अल्पविराम,प्रश्नचिन्ह इत्यादी) जाणीवपूर्वक वापर करतात.
05.01.10 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक(उदा.विरामचिन्ह,काळ,क्रियापद,लिंग,वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.
05.01.11 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी ? हे चिन्ह दाखून या चिन्हाला काय म्हणतात हे विद्यार्थ्यांना विचारावे. शिक्षकांनी प्रश्नचिन्ह असलेली काही वाक्य विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावी व त्यात कोणते चिन्ह लिहावयाचे राहिले ते विचारावे .

1.तुझा वाढदिवस केव्हा असतो

२.कोरोना काळात तू स्वतःची काय काळजी घेतली

3. तुझा आवडता पदार्थ कोणता

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक माहितीविषयी प्रश्न विचारावेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एकमेकांना प्रश्न विचारण्याची संधी द्यावी. प्रश्न विचारल्यानंतर शेवटी कोणते चिन्ह येते याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. प्रश्नचिन्ह केव्हा व कोठे वापरतात हे शिक्षकांनी स्पष्ट करावे.

प्रश्नचिन्ह असलेली वाक्ये फळ्यावर लिहावी ,समजावून द्यावी .अशी वाक्ये विद्यार्थ्यांना लिहायला सांगांवी , आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे .

सराव करू या

शिक्षकांनी विरामचिन्ह नसलेली वाक्ये विद्यार्थ्यांना द्यावी व त्याचा वैयक्तिक व गटात सराव करून घ्यावा.

(अ) पुढील वाक्ये वाचा व त्यात योग्य विरामचिन्ह लिहून वाक्य पुन्हा लिहा.

1. इंद्रधनुष्यात किती रंग असतात

2. भारताचे पहिले पंतप्रधान कोण होते

३. तुम्ही टाळ्या केव्हा वाजवता

(आ) त्याने असे का केले असेल ? या वाक्यात कोणते विरामचिन्ह आले आहे.

(इ). पुढीलपैकी कोणत्या वाक्यात प्रश्नचिन्ह आले आहे ते ओळखा व ते वाक्य पुन्हा लिहा.

1. तू नेहमी शाळेत जा.

२. "अबब! केवढा मोठा प्राणी हा !"

३. विद्यार्थ्याला पुस्तक कोणी दिले?

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कृती करायला सांगावे.

१.खूप पाऊस पडला? २. खूप पाऊस पडला.

या दोन वाक्यात प्रश्नचिन्ह असताना आणि नसताना वाक्याच्या अर्थामध्ये काय बदल होतो याविषयी चर्चा करा.

२ . ? , ! या चिन्हातून तुम्हाला कोणती चित्रे सुचतात. या आकारावरुन तुम्हाला आवडेल असे एक चित्र काढा व त्याला रंग द्या.

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

१३

क्षेत्र-भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता - लेखन** **संकल्पना- उद्गारवाचकचिन्ह**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.17 - विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा (पूर्णविराम,अल्पविराम,प्रश्नचिन्ह इत्यादी) जाणीवपूर्वक वापर करतात.
05.01.10 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक(उदा.विरामचिन्ह,काळ,क्रियापद,लिंग,वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.
05.01.11 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी ! हे चिन्ह दाखवून या चिन्हाला काय म्हणतात हे विद्यार्थ्यांना विचारावे. शिक्षकांनी खाली लिहिलेल्या वाक्यांसारखी वाक्य फळ्यावर लिहावीत. ती वाक्ये विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावीत व त्यात कोणते चिन्ह लिहावयाचे राहिले ते विचारावे.

1. अबब केवढा मोठा प्राणी हा
२. किती उंच इमारत आहे ही
3. बापरे केवढा मोठा हा अजगर

सक्षम बनू या

राग,आनंद,भीती,आश्चर्य या भावना व्यक्त करणारी वाक्ये शिक्षकांनी सांगावी किंवा फळ्यावर लिहावी व ती वाक्ये विद्यार्थ्यांना वाचायला सांगावी. वाक्यात कोणता कोणत्या भावना व्यक्त झाल्या आहेत त्याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी .उदगार असलेली आणखी वाक्ये विद्यार्थ्यांना विचारावीत. या वाक्यात कोणते चिन्ह असते याविषयी विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करावी.

उद्गारचिन्ह वाक्यात केव्हा केव्हा वापरतात हे शिक्षकांनी स्पष्ट करावे , उदाहरणे द्यावी व याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. उद्गारवाचकचिन्ह वाक्यात लिहून दाखवावे व विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा.

सराव करू या

शिक्षकांनी विरामचिन्ह नसलेली वाक्ये विद्यार्थ्यांना द्यावी व त्याचा वैयक्तिक व गटात सराव करून घ्यावा.

(अ) पुढील वाक्ये वाचा व त्यात योग्य विरामचिन्ह लिहून वाक्य पुन्हा लिहा.

1. शाबास उत्तम गुण मिळवलेस
2. अरे वा चिमुकल्यांनो
३. आता काय बोलाव कपाळ

(आ) काय तो चमत्कार ! या वाक्यात कोणते विरामचिन्ह आले आहे.

(इ). पुढीलपैकी कोणत्या वाक्यात उद्गारचिन्ह आले आहे ते ओळखा व ते वाक्य पुन्हा लिहा.

1. भारत माझा देश आहे.
२. किती ताजेतवाने झाल्यासारखे वाटते !
३. भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता आहे ?

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कृती करायला सांगाव्यात.

अ)विरामचिन्ह बदलल्यास वाक्याचा अर्थ बदलू शकतो का ? त्याविषयी माहिती मिळवा.

१.केवढी भव्य इमारत होती ती ?

२.केवढी भव्य इमारत होती ती !

आ) दररोजच्या बोलण्यात उदगार कोणत्या वाक्यात येतात अशी चार-पाच वाक्ये लिहा.

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

१४

क्षेत्र – वाचन **कौशल्य / संकल्पना - मूकवाचन**

अध्ययन निष्पत्ती – 04.01.09 वाचायला उत्सुक असतात आणि वाचनकोपरा / ग्रंथालयातील आपल्या आवडीची पुस्तके निवडतात.व त्याचे वाचन करतात

05.01.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी साहसी,सामाजिक विषयावरीलकथा ,कविता इ.)विषय घटना ,चित्र,पात्र,व शीर्षक याबाबत चर्चा करतात प्रश्न विचारतात,आपले मत देतात,तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी वाचन कोपरा किंवा वाचनालयातील गोष्टींची पुस्तके (उदा. पंचतंत्र, अकबर बिरबल, महाभारत, रामायणातील कथा) मुलांसमोर ठेवावीत.मुलांना त्यांच्या आवडीची गोष्टीची पुस्तके निवडण्यास सांगावीत.त्यानंतर त्या गोष्टीचे ठराविक वेळेत मुकवाचन करण्यास सांगावे.गोष्टींचे वाचन झाल्यानंतर वाचन समजपूर्वक झाले की नाही हे पाहण्यासाठी वाचलेल्या गोष्टीवर आधारित काही प्रश्न शिक्षकांनी मुलांना विचारावेत .आलेल्या उत्तरावरून मुलांनी गोष्टीचे समजपूर्वक वाचन केले की नाही हे शिक्षकांना समजेल.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरील कृती घेताना आलेल्या अनुभावरून वर्गात चर्चा घ्यावी .चर्चा करत असताना मनातल्या मनात वाचन कसे करावे हे सांगावे. मनात वाचत असताना अर्थाकडे लक्ष देणे आवश्यक आहे, हे सांगावे. गोष्ट वाचताना मागील प्रसंगाचा पुढील येणाऱ्या प्रसंगाशी संबंध जोडत वाचन कसे करावे,हे सांगावे.गोष्ट वाचत असताना येणाऱ्या नवीन शब्दांचा अर्थ लक्षात घेऊन वाचन करावे , हे स्पष्ट करावे.

सराव करू या

१)शिक्षकांनी मुलांना इ. ४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं २२ वरील ८.गुणग्राहक राजा हा पाठ मनात वाचण्यास सांगावे

२..शिक्षकांनी मुलांना पाठातील आशय समजला ना यासाठी या पाठावर पाठावर आधारित काही प्रश्न मुलांना विचारावेत.

३.शिक्षकांनी वेगवेगळ्या कृतींच्या चिठ्ठ्या बनवून प्रत्येक मुलांना एक एक चिठ्ठी घ्यायला सांगावे.त्यानंतर घेतलेली चिठ्ठी मनातल्या मनात वाचून त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावी.
उदा. फळ्यावर तुझे नाव लिही , तुझ्या आवडीच गाणं म्हण

कल्पक होऊ या

१) मुलांनी एखादी गोष्ट मनात वाचून ती गोष्ट व वर्गासमोर सादर करवी करण्यास सांगावी.

२) मुलांनी वाचलेल्या गोष्टीच्या ओळी वहीत लिहिण्यास सांगावे.

३) शिक्षकांनी पुढील वाक्य मनात वाचण्यास सांगावे. व त्यातील आशय न बोलता व्यक्त करण्यास सांगावे.

१)आई झोपली . २) माझ पोट दुखतंय .

३) मला झोप आली. ४)आपण लंगडी हा खेळ खेळू.

५) मला भूक लागली आहे. ६) मला अभ्यास करायचा आहे..

१५

सेतु अभ्यास चाचणी क्रमांक -१

विषय – मराठी

इयत्ता- पाचवी

विद्यार्थ्याचे नाव : -

एकूण गुण : १०

प्रश्न क्र.१ दवाखान्यात रुग्णांची सेवा करणाऱ्या नर्सला तिच्या कामाविषयी विचारता येतील असे दोन प्रश्न सांगा/लिहा. (गुण १)

प्रश्न क्र.२'माझी सायकल शिकताना झालेली गंमत/ फजिती' या विषयावर तुझा अनुभव सांगा. (गुण १)

प्रश्न क्र३. **पुढील वाक्यातील प्रश्नचिन्ह असलेले वाक्य ओळखून पुन्हा लिहा. (गुण १)**

१)काय सुरेल गातो तो!

२) आज सोमवार आहे.

३) भारताचा राष्ट्रीय प्राणी कोणता?

प्रश्न क्र.४. पुढील वाक्यात योग्य विरामचिन्ह निवडून लिहा. (? , ! .) (गुण १)

१) किती सुंदर होता तो मोर

२) शशी सोम इंदू ही चंद्राची नावे आहेत.

प्रश्न क्र.५ पुढील शब्दांचे मोठ्याने वाचन कर . (गुण १)

महाराष्ट्र ,स्वच्छता , नक्षत्र, शिष्यवृत्ती, ,समुद्र हिरव्या,डॉक्टर

प्रश्न करा.६ पुढील वाक्य मोठ्याने वाच. (गुण १)

" जा रे, स्वयंपाकघरात काही शिल्लक असेल ते घेऊन ये बघू!"

प्रश्न क्र.७ खालील बातमी वाचा व ती कोणत्या ठिकाणची आहे ते सांगा. (गुण १)

दोहा: बंगळुरूच्या भारतीय संगीत विद्यालयाने सप्टेंबर महिन्यात आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑनलाईन तबला वादन स्पर्धेत कतारच्या स्किल्स डेव्हलपमेंट सेंटरमधील चमूने नेत्रदीपक यश मिळवले. जवळपास महिनाभर पार पडलेल्या या स्पर्धेत अमेरिका, ब्रिटन, संयुक्त अरब अमिरात, कतार, सिंगापूर ऑस्ट्रेलिया आदी विविध देशांतील संगीत संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या तबला वादकांनी सहभाग घेतला होता.



SCERT MAHARASHTRA PUNE

प्रश्न क्र .८ पुढील विनोद वाचा व हा संवाद कोणामध्ये झाला ते सांगा. (गुण १)

मावशी: अरे राजू ,मोटारीने तुला धडक दिली म्हणे.

राजू:हो,त्या वेळी मी रस्त्यावरचा फलक वाचत होतो.

मावशी : काय लिहिलं होतं त्या फलकावर?

राजू : रस्त्यावरचे अपघात टाळा.

प्रश्न क्र.९ खालील कविता वाचा व पुढील प्रश्नांची उत्तरे पर्यायमध्ये शोधा. (गुण १)

हिरव्या रानी शुभ्र ससे
सशांचे डोळे लाल लाल
त्यांना पाहून रागाने
गुंजा आपले फुगवतील गाल

'शुभ्र ' या शब्दाचा खालील पैकी समानार्थी शब्द कोणता?

१) पांढरा २) ससा ३) लाल

प्रश्न क्र.१० खालील वाक्यात कोणत्या झाडाविषयी सांगितले आहे? (गुण १)

आमच्या शेवग्याला सुंदर, हिरवट पोपटी नाजूक पालवी फुटली होती .

SCERT MAHARASHTRA PUNE

१६

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **संकल्पना - जाहिरात वाचन**


अध्ययन निष्पत्ती –

04.01.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक ,प्रसिद्धीफलक इ.) यांचे समजपूर्वक वाचन करतात.

05,01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी (फलकावरील सूचना,कार्य अहवाल,माहिती मिळविण्यासाठी इ)वाचतात.लिहितात

जाणून घेऊया

शिक्षकांनी खाली दिलेल्या नमुन्याच्या मदतीने विद्यार्थ्याकडून जाहिरातीचे वाचन करून घ्यावे .त्यावर आधारित खालील प्रकारचे प्रश्न विचारावेत .त्यावरून विद्यार्थ्याचा प्रतिसाद जाणून घ्यावा.



प्रश्न : १) ही जाहिरात कशा संदर्भात आहे ?

२) उद्घाटन समारंभ केव्हा आहे ?

३)प्रदर्शनाचे उद्घाटन कोण करणार आहे ?

४)प्रदर्शनाचा कालावधीव वेळ किती आहे ?

५) प्रदर्शनाचे ठिकाण कोणते ?

सक्षम बनू या

जाहिरात ही संकल्पना दृढ होण्याच्या दृष्टीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.पुढील माहिती द्यावी.

- आपला माल किंवा वस्तू ,प्रदर्शन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जाहिरात केली जाते.जाहिरातीमुळे जास्त लोकांना वस्तूची माहिती मिळते.त्यामुळे वस्तू जास्तीत जास्त प्रमाणात विकली जाते.
- जाहिरातीत वस्तू किंवा प्रदर्शनाची सगळी माहिती दिलेली असते .

- शिक्षकांनी विविध प्रकारच्या ,विविध विषयाच्या जाहिरातीचे नमुने मुलांना दाखवावेत.व जाहिरात या संकल्पनेचे दृढीकरण करून घ्यावे. उदा. कपडे ,फर्निचर ,पुस्तके ,शिबिरे,विविध प्रकारचे क्लासेस इ.

सराव करू या	कल्पक होऊ या
शिक्षकांनी वर्तमानपत्र.मासिके यातून मिळणाऱ्या जाहिरातीचे नमुने विद्यार्थ्यांना देऊन पुढील कृती करून घ्याव्यात . १)जाहिरातीचे वर्गीकरण करून घेणे.उदा.वस्तूची. प्रदर्शनाची ,क्लासेसची २)जाहिरातीचे वाचन व आकलन ३)मुलांची गटात विभागणी करून जाहिरातीवर प्रश्नोत्तरे	१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मुलभूत चर्चा करून जाहिरात बनविण्यास प्रवृत्त करावे. २)मुलांनी शाळेत बनविलेल्या पणत्या व उटणे विकण्यासाठी ची जाहिरात तयार करण्यास सांगावे .

SCERT MAHARASHTRA

१७

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- क्रियापदाचा लेखनात वापर**

अध्ययन निष्पत्ती-

चौथी:-भाषेतील विविध बारकावे उदाहरणार्थ शब्दांची पुनरावृत्ती सर्वनाम ,विशेषण ,लिंग , वचन इत्यादींविषयी सजग राहून लेखन करतात.

पाचवी:- भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक (उदा.विरामचिन्ह, काळ, क्रियापद, लिंग ,वचन ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील चित्र दाखवावीत व या चित्रांमधील मुले कोणती क्रिया करत आहेत ते शोधायला सांगावे व त्या क्रियेचे वर्णन करणारे क्रियापद लिहायला सांगावे .या क्रियापदावरून तयार होणारे वाक्य विद्यार्थ्यांना लिहायला सांगून त्या वाक्यातील क्रियापद अधोरेखित करायला सांगावे.



उदा-वरील चित्र

क्रियापद:-हसणे

वाक्य :-मुलगी **हसत आहे.**

याप्रमाणे पुढील चित्रे विद्यार्थ्यांना दाखवा व कृती करून घ्या.



शिक्षकांनी वरील चित्रावरून विद्यार्थ्यांकडून वाक्ये लिहून घ्यावीत. विदद्यार्थ्यांनी लिहिलेली वाक्ये वाचावीत व विद्यार्थ्यांनी क्रिया ओळखून योग्य क्रियापदांचा वापर केला आहे की नाही व क्रियापदे अधोरेखित केली आहेत की नाही ,क्रियापदांचा योग्य वापर केला आहे का? त्यावरून क्रियापदांची ओळख व क्रियापदांचा लेखनातील वापर यासंबंधी विद्यार्थ्यांना जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना क्रियापदाविषयी व क्रियापदांच्या लेखनातील वापरासंबंधी पुढील मार्गदर्शन करावे.

वाक्यात कोणती क्रिया केली आहे हे आपल्याला क्रियापदामुळे कळते पण त्यामुळे वाक्याचा अर्थ पूर्ण होतो हे महत्त्वाचे.

1)ज्या शब्दामुळे केलेली क्रिया तर कळतेच पण वाक्याचा अर्थही पूर्ण होतो त्याला वाक्याचे क्रियापद म्हणतात.'

2)वाक्याचा अर्थ पूर्ण करणे क्रियापदाचे मुख्य काम आहे, वाक्यात त्याची जागा कुठे आहे ही गोष्ट महत्त्वाची नसते .

3)बऱ्याच वाक्यात क्रियापद शेवटी येते पण काही अशी वाक्ये सांगतील की त्या वाक्यात क्रियापद मध्यभागी कुठेही आले आहे.(उदा. १)इंद्रनील मला तुझा पेन देतोस का थोडावेळ ? २)आणाल का औषधे घरी येताना ?)

4)काही वाक्यात दोन क्रियापदे असतात पण वाक्याचा अर्थ एका क्रियापदानेच पूर्ण होतो म्हणून असे क्रियापद मुख्य क्रियापद मानले जाते. (उदा .राहुलने झाडाचे आंबे तोडून सर्वांना वाटले. या वाक्यात तोडून व वाटले ही दोन क्रियापदे आहेत पण वाटले या क्रियापदाने वाक्याचा अर्थ पूर्ण झाला आहे म्हणून वाटले हे मुख्य क्रियापद आहे.)

5)क्रियापदांचा वाक्यांमध्ये वापर होत असताना मूळ क्रियापदाची वेगवेगळी रूपे वापरली जातात.(उदाहरणार्थ :-उठणे हे क्रियापद आहे याचा वाक्यात वापर होत असताना आम्ही पहाटे उठतो, राम खुर्चीवरून उठला, शबाना उठून उभी राहिली. अशी वेगवेगळी रूपे वापरली जातात याला क्रियापदांची रूपे व अशा वापराला क्रियापद चालवणे असे म्हणतात उठणे हे या वरील सर्व वाक्यातील क्रियापदाचे मूळ रूप आहे

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून सरावासाठी पुढील कृती करून घ्यावी.

१)पुढे कंसात दिलेल्या क्रियापदांमधील योग्य अर्थाचे क्रियापद योग्य त्या रूपात वापरून पुढील वाक्ये पूर्ण करा.

(घालणे, फवारणे ,तोडणे,लावणे,)

अ)चिंगीने घरासमोर आंब्याची झाडे .....

ब) आंब्याच्या झाडांना तिने तीन-चार वर्ष गरजेनुसार पाणी .....

क) आंब्याच्या झाडाला मोहोर आल्यावर त्यावर तिने औषध .....

ड) आंब्याच्या झाडाला आंबे आले आल्यावर तिने ते सर्व आंबे.....

२)करणे या क्रियापदाची वेगवेगळी रूपे असणारी वाक्ये लिहा.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्यावी. पुढील परिच्छेद फळ्यावर लिहावा व विद्यार्थ्यांना सांगावे की ....

पुढे दिलेल्या परिच्छेदातील वाक्यांमध्ये काही क्रियापदे चालवलेली आहेत तर काही मूळ रूपातच आहेत. ती शोधून काढा आणि चौकटींमध्ये लिहा

दर पावसाळ्यात माझे मित्र सहलीला डोंगरावर जातात. खरेतर या सहलीला जाणे यात त्यांच्या मुलांना खूप आनंद वाटतो .सहलीला जाणे ,डोंगरावर फिरणे ,डोंगरावर चढून आनंद लुटणे ,झाडावर चढणे ,झाडावर चढून फळे खाणे यात त्यांना खूप आनंद वाटतो .इतर वेळेस कुठे जाणे-येणे नसल्याने सहलीला जाऊन आनंद लुटणे यात त्यांना खूप आनंद लुटायला मिळतो.

चालवलेले क्रियापद	मूळ रूपातील क्रियापद

१८

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- स्वल्पविरामाचा लेखनात वापर**

अध्ययन निष्पत्ती-

चौथी: विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा (पूर्णविराम ,अल्पविराम, प्रश्नचिन्ह इत्यादी)जाणीवपूर्वक वापर करतात.

पाचवी:- 1)भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा (उदा पूर्णविराम, स्वल्पविराम,अर्धविराम, प्रश्नचिन्ह,उद्गार चिन्ह)जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.2)भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक (उदा.विरामचिन्ह, काळ, क्रियापद, लिंग ,वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वल्पविराम असलेली पुढील वाक्ये सांगून ती लक्षपूर्वक ऐकायला सांगावीत. वाक्य सांगताना विरामचिन्हांचा प्रभावी वापर होईल अशाप्रकारे सांगवीत पुढीलप्रमाणे सूचना द्याव्यात..

(वाक्ये ऐकून लिहा. योग्य त्या ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करा.)

1)विठाईच्या कंपासपेटीत एक पेन, दोन पेन्सिली, एक रबर, एक पट्टी आणि एक कर्कटक आहे.

2)इंद्रनील सासवडच्या आठवडे बाजारात गेला.त्याने बाजारातून भेंडी,कारली ,दोडके ,मिरच्या, आले, बटाटा, कांदे घेतले व पिशवीत भरून तो घराकडे निघाला.

3 हैबती जंगलात गेला. जंगलातून त्याने करवंदे,चिंचा, बोरे,जांभळे, आंबे आणले.

वरील तिन्ही वाक्ये विद्यार्थ्यांकडून लिहून घ्यावीत.विद्यार्थ्यांनी लिहिलेली वाक्ये वाचावीत व विद्यार्थ्यांनी योग्य ठिकाणी स्वल्पविराम व इतर विरामचिन्हांचा वापर केला आहे की नाही हे पाहावे. यावरून स्वल्पविरामाबद्दल विद्यार्थ्यांची कितपत जाण आहे हे जाणून घ्यावी

सक्षम बनू या

शिक्षकांनी स्वल्पविराम या विरामचिन्हाचा वापर लेखनात केव्हा होतो हे विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे सांगावे.

अ)एकाच वाक्यात एकाच प्रकारचे शब्द म्हणजेअनेक नामे,अनेक विशेषणे,अनेक क्रियापदे,वाक्यांचे लहान तुकडे वगैरे एकापाठोपाठ एक यादी केल्यासारखे आले तर ते एकमेकांपासून वेगळे दाखविण्यासाठी स्वल्पविरामाचा वापर होतो.

1) रहीमच्या पिशवीत मोबाईल, बॅट,कॅमेरा व पुस्तके आहेत.(या वाक्यात वस्तूंच्या नावांची म्हणजे नावांची यादी आहे व दोन वस्तूंच्या नावांमध्ये स्वल्पविराम या चिन्हाचा वापर केल्यामुळे विविध वस्तूंच्या नावांचा उल्लेख स्पष्टपणे जाणवत आहे.)

2)दुकानातून बाहेर पडलेला तो माणूस बुटका,जरासा लठ्ठ,गबाळा आणि साधाभोळा दिसत होता.(या वाक्यात त्या व्यक्तीचे वर्णन करणाऱ्या शब्दांची म्हणजे विशेषणांची यादी आहे .दोन विशेषणांमध्ये स्वल्पविराम या चिन्हाचा वापर केल्यामुळे विविध विशेषणांचा उल्लेख स्पष्टपणे जाणवत आहे.)

3) आरतीने पिशवीतून सगळ्या भाज्या काढल्या, वेगळ्या केल्या ,निवडल्या,धुतल्या ,चिरल्या आणि डब्यांमध्ये भरून ठेवल्या.(या वाक्यात क्रियापदांची यादी आहे)

4) आभाळातून बर्फाचे छोटे पुंजके तरंगत, हेलकावत, झोके घेत ,अलगद जमिनीवर टेकत होते या वाक्यात क्रियाविशेषण यांची यादी आहे .(दोन क्रियाविशेषणांमध्ये स्वल्पविराम या चिन्हाचा वापर केल्यामुळे विविध क्रियाविशेषणांचा2 उल्लेख स्पष्टपणे जाणवत आहे .)

ब) वाक्यातील अशा यादी असलेल्या शेवटच्या शब्दानंतर स्वल्पविराम देत नाहीत कारण तिथे थांबण्याची गरज नसते.

क) अशा यादीत दोनपेक्षा अधिक शब्द असतील तरच स्वल्पविरामांचा वापर केला जातो.दोनच शब्द असल्यास 'आणि' किंवा 'व' अशा उभयान्वयी म्हणजे दोन शब्द किंवा वाक्य जोडणाऱ्या अव्ययांनी काम भागते.

ड) यादी संपल्याचे लक्षात यावे म्हणून शेवटचे दोन शब्द स्वल्पविरामाऐवजी 'आणि' किंवा 'व' वापरून वेगळे दाखवले जातात.

इ) खूप मोठे वाक्य असेल व त्या वाक्यात दोन क्रिया दर्शवणारी क्रियापदे असतील तर पहिल्या क्रियेच्या वाक्यानंतर स्वल्पविराम वापरला जातो. व दुसऱ्या वाक्यानंतर मग पूर्णविराम दिला जातो.(स्वराजने बाजारात जाऊन आंबे आणले, ते आईला आमरस करण्यासाठी स्वयंपाकघरात जाऊन दिले).

फ) संबोधन दर्शवताना स्वल्पविरामाचा वापर होतो (उदाहरणार्थ :- मुलांनो,कामाला लागा.)

सराव करू या

शिक्षकांनी परिच्छेद फळ्यावर लिहावा व पुढीलप्रमाणे सूचना द्यावी (पुढील परिच्छेद वाचा व योग्य ठिकाणी स्वल्पविरामांचा वापर करून तो परिच्छेद पुन्हा लिहा.)

स्वराली व तिच्या मित्र मैत्रिणींनी पुरंदर किल्ल्यावर सहलीला जायचे ठरवले सहलीला त्यांच्यासोबत मीना रहीम ज्यूली व हरप्रीत गोंदया चिंगी हे मित्र- मैत्रिणी होते प्रत्येकाने दोन-दोन पदार्थ आणायचे ठरवले दुपारी जेवताना सर्वांनी आपापल्या पिशवीतून पदार्थ बाहेर काढले व कागदावर ठेवले कागदावर शेंगदाणे फुटाणे भेळ चकली करंजी शेंगदाण्याची चटणी अळूची वडी चिक्की लाडू पराठा थालीपीठ नाचणीची भाकरी भात हे पदार्थ जमा झाले दिवसभरात त्यांनी प्राणिसंग्रहालय वस्तुसंग्रहालय किल्ला धरण प्रदर्शन या ठिकाणी भेट दिली

कल्पक होऊ या

शिक्षकांनी पुढील वाक्ये फळ्यावर लिहावीत व विद्यार्थ्यांना पूर्ण करण्यास सांगावीत.कंसात दिलेल्या सूचना द्याव्यात.

1)महाराष्ट्र राज्यात शिवनेरी, ... हे किल्ले आहेत.

(वरील वाक्य पूर्ण करा व किल्ल्यांच्या यादीत योग्य ठिकाणी स्वल्पविरामांचा वापर करा.)

2) महाराष्ट्र राज्यात गणेशोत्सव, नारळी पौर्णिमा, ईद .....

हे सण व उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.(वरील वाक्य पूर्ण करा व सणांच्या यादीत योग्य ठिकाणी स्वल्पविरामांचा वापर करा)

3) फुले .....….....असतात..(वरील वाक्य पूर्ण करा व फुलांची गुणवैशिष्ट्ये असणारे शब्द एकापाठोपाठ वापरा. योग्य ठिकाणी स्वल्पविरामांचा वापर करा.)

4) इयत्ता पाचवीला मराठी .....

.....हे विषय आहेत. (वरील वाक्य पूर्ण करा.रिकाम्या जागी पाचवीच्या विषयांची नावे लिहा)

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

१९ **क्षेत्र- लेखन** **संकल्पना- प्रश्नचिन्हाचा लेखनात वापर**

अध्ययन निष्पत्ती-

चौथी: विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक वापर करतात.

पाचवी:- भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा (उदा.पूर्णविराम, स्वल्पविराम,अर्धविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह)जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या

अ)शिक्षकांनी फळ्यावर पुढील वाक्ये लिहावीत .विद्यार्थ्यांना प्रश्नार्थक(प्रश्न चिन्हांचा वापर असलेली) वाक्यांचे क्रमांक लिहायला सांगावेत.

1)काल पाऊस पडला?

2)जंगलाला आग लागली तेव्हा तो जंगलात होता.

3) तू बाजारात गेला होता.

4) मैनाला गणित विषय आवडतो?

5)जंगलाला आग लागली तेव्हा तो जंगलात होता?

6)तू बाजारात गेला होता?

7)काल पाऊस पडला.

8) मैनाला गणित विषय आवडतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरांवरून विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्हांच्या वापराबाबत कितपत माहिती आहे हे जाणून घ्यावे.

शिक्षक विद्यार्थ्यांना पुढील प्रसंगात ते कोणते वाक्य म्हणतील.ते वाक्य लिहायला सांगतील.लिहिताना योग्य विरामचिन्हाचा वापर करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे।

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील प्रसंग देऊन प्रत्येक प्रसंगावर एक वाक्य योग्य त्या विरामचिन्हासह लिहायला सांगावे.

1)तुमच्या मित्र/मैत्रिणीकडे घड्याळ आहे तुम्हाला त्याला/तिला वेळ विचारायची आहे यासाठी तू कोणते वाक्य म्हणशील ते लिही.

2) तुझ्या मित्राकडे दोन पेन आहेत त्यापैकी एक पेन तुला घ्यायचा/मागायचा आहे. तू त्याला कोणते वाक्य म्हणशील ते लिही.

3)तुझ्या मित्र-मैत्रिणीचा सर्वांत आवडता पदार्थ तुम्हाला माहिती करून घ्यायचा आहे तो पदार्थ माहित करून घेण्यासाठी तुम्ही त्याला कोणते वाक्य म्हणाल ते लिहा.

शिक्षक विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरांवरून विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्हाच्या वापराबाबत कितपत माहिती आहे हे जाणून घेतील.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्हाचा वापर वाक्यात केव्हा व कुठे होतो याबाबत पुढीलप्रमाणे माहिती सांगावी व उदाहरणे द्यावीत.

1एखाद्या व्यक्तीला काही विचारायचे असेल तर त्या वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह येते.

(उदा.तुझ्याकडे किती पेन आहेत?,विहिरीला पाणी लागले का?)

2)मुलाखत घेताना मुलाखत घेणारा हा मुलाखत देणाऱ्याला प्रश्न विचारत असतो.

(तुम्ही कोणकोणती पुस्तके आत्तापर्यंत वाचलीत?तुम्हाला सर्वाधिक आवडलेले पुस्तक कोणते?तुमचे आवडते लेखक कोणते?)

3)समोरच्या व्यक्तीकडे काही मागायचे असेल तर त्या व्यक्तीला आपण जे विचारतो तेव्हाही प्रश्नचिन्हाचा वापर केला जातो .

(मला तुझ्याकडील पुस्तक वाचण्यासाठी देशील का?)

4)परवानगी मागणाऱ्या वाक्यांमध्ये प्रश्नचिन्ह येते.

(उदा.साहेब, मी ऑफिसमधून आज लवकर घरी जाऊ का ?)

5) लिहीत असलेल्या माहितीमध्ये माहितीबद्दल लिहिणाऱ्यालाच खात्री नसते किंवा पुरेसे ठोस पुरावे लिहिणाऱ्याला मिळालेले नसतात तेव्हा प्रश्नचिन्ह याचा वापर केला जातो.

उदा.

अ)किशोर मासिकाच्या 1987 (?) सालच्या एका अंकात ही गोष्ट प्रसिद्ध झालेली होती.

ब)आजोबांनी वयाच्या सहाव्या वर्षी (?)तबल्याचे शिक्षण त्यांच्या गुरुजींकडे घ्यायला सुरुवात केली होती.

6) काही वेळा प्रश्नचिन्हाचा वापर काहीशा तिरकसपणे उपहासाने ही केला जातो.

उदा.

अ)अनेक सुशिक्षित (?) लोक हे अंधश्रद्धा पाळतात.

(थोडक्यात या लोकांना सुशिक्षित म्हणावे का असा प्रश्न लेखकाला पडला आहे.)

सराव करू या

शिक्षकांनी पुढील उतारा फळ्यावर लिहावा आणि विद्यार्थ्यांना योग्य विरामचिन्हांचा वापर करून तो उतारा पुन्हा लिहावयास सांगावा.

एकदा आई आजारी पडली आईला खोकला येत होता आमचे घर दूर जंगलात असल्यामुळे जवळ दवाखाना नव्हता आता काय करू हा प्रश्न मला पडला घरगुती कोणते औषध द्यावे हे मला कळेना अडुळशाचा काढा घेतल्यावर खोकला बरा होतो हे मी ऐकले होते घराभोवती अडुळशाचे झाड आहे असे बाबांनी एकदा घरासमोरील झाडांची माहिती देताना मला सांगितले होते ते झाड कोणते हे मला कळेना शेवटी मी आईला झोपेतून उठवले घरासमोरील दोन-तीन झाडांची पाने आणली आणि अडुळशाचे पान कोणते हे मी आईला विचारले

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील सूचना देऊन विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्यावी.

अ)तुम्हाला एका शेतकऱ्याची मुलाखत घ्यायची आहे त्यासाठी प्रश्न तयार कर व लिही.

ब) कोणी,कधी,कुठे,कसे,कोणाबरोबर,कशासाठी,केव्हा या शब्दांचा वापर करून प्रश्न तयार करा.

२०

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**


क्षेत्र – वाचन **संकल्पना - सूचनाफलक वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक ,प्रसिद्धीफलक इ.) यांचे समजपूर्वक वाचन करतात.

05.01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी(फलकावरील सूचना ,कार्य अहवाल,माहिती मिळविण्यासाठी वाचतात व लिहितात.

जाणून घेऊया



शिक्षकानी मुलांना इ .४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं ६९ वरील सूचना फलकाचे वाचन करण्यास सांगावे . शिक्षकांनी सूचना फलकावर आधारित पुढील प्रश्न विचारावे

1) वरील चित्र कोणत्या ठिकाणचे आहे ?
2) चित्रात काय काय दिसत आहे ?
3) सूचनाफलकावर कोणत्या सूचना दिल्या आहेत ?
4) किल्ला चढताना सुरवातीलाच सूचना का दिल्या आहेत?
5) किल्ला पाहायला येणाऱ्याना सूचना देण्याची गरज आहे का ? व का?

सक्षम बनू या

- शिक्षकांनी वरील सूचनाफलकाचे प्रकट वाचन करावे .
- मुलांना विविध प्रकारचे प्रश्न विचारून सूचना फलकाविषयी चर्चा करावी. .
- सूचना फलक कोठे कोठे आढळून येतात. हे विद्यार्थ्यांना चर्चेद्वारे सांगावे .
- सूचना फलकाची गरज का असते , हे स्पष्ट करावे.
- वेगवेगळ्या सूचना फलकांचे नमुने विद्यार्थ्यांस वाचनास उपलब्ध करून द्यावेत.

सराव करू या

१) शिक्षकांनी ३ -४ मुलांचे गट करून गटात पुढील प्रकारातील सूचनांच्या पट्ट्या करून वाचण्यास द्यावे .गटातील इतर मुलांनी वाचलेल्या सूचनेवर आधारित प्रश्न विचारून एकमेकांत चर्चा करतील. याठिकाणी शिक्षक सुलभकाची भूमिका निभावतील

हळू आवाजात बोला
येथे थुंकू नये .

.

चपला बाहेर काढा .
येथे कचरा टाकू नये.

कल्पक होऊ या

१)सूचना फलक कोठे कोठे असतात याचा शोध घ्या.व त्या सूचना वाचा व वहीत लिहा.

२)तुमच्या शाळेत कोणकोणत्या सूचनांचे फलक लावता येतील ते वहीत लिहा. व लिहिलेल्या सूचनांचे मोठ्या अक्षरात फलक करून शाळेत लावा

SCERT MAHARASHTRA

२१

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- श्रुतलेखन**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.15 - स्वतःच्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखन प्रक्रिया समजून घेतात,स्वतःचे लेखन तपासून घेतात.लेखनाची उद्दिष्टे आणि वाचक यांनुसार त्यात बदल करतात.

05.01.08 – स्वताच्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरविलेल्या कृतींअतर्गत लेखन प्रक्रिया उत्तम तऱ्हेने समजून स्वताचे लेखन पडताळतात. लेखानाचा उद्देश व वाचक यानुसार आवश्यक बदल करतात.

जाणून घेऊ या

. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वरचिन्हयुक्त शब्दांचे /वाक्यांचे श्रुतलेखन द्यावे.

उदा. पिशवी,पेशवाई,कैवारी,सौरभ इ.

आम्ही शाळेत वृक्षारोपण केले.

वरील शब्दांचे/वाक्यांचे लेखन करून घेऊन ते तपासतात व चुकीचे शब्द दुरुस्त करून पुन्हा लिहिण्यास सांगावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी श्रुतलेखनाचे नियम समजून सांगताना ऱ्हस्व- दीर्घ उच्चार असलेल्या शब्दांचे श्रुतलेखन कसे करतात हे उदाहरणासह समजावून द्यावे. श्रुतलेखन करताना पूर्णविराम ,स्वल्पविराम,प्रश्नचिन्ह इत्यादी विरामचिन्हांचा वापर कसा करतात ते उदाहरणासह स्पष्ट करावे.

उदा. १.दिपालीने पिशवीत हिरवी मिरची, काकडी,मेथी आणि कारली आणली.

२.महाराष्ट्र राज्यात एकूण किती जिल्हे आहेत ? अशा प्रकारची आणखी काही वाक्ये विद्यार्थांना श्रुतलेखनासाठी द्यावी. विद्यार्थ्यांनी लिहिलेले वाक्य तपासावे .विद्यार्थ्यांच्या झालेल्या चुका दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहिण्यास सांगावे .

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून गटप्रमुखाला पुस्तकातील एक छोटासा उतारा श्रुतलेखनासाठी सांगण्यास सांगावे .लिहून झाल्यानंतर मुलांना पुस्तक काढून स्वतःचा उतारा स्वतः तपासण्यास सांगावे.चुकीची दुरुस्ती करण्यास सांगावे .

कल्पक होऊ या

शिक्षकांनी पुढील कृती विद्यार्थांना करण्यास सांगावे .

शाळेतील सूचनाफलक, गावातील दुकानांवरील पाट्या यांचे वाचन करा. ते वहीत लिहून काढा.

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

२२

क्षेत्र- भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता - लेखन** **संकल्पना-एका शब्दाचे दोन अर्थ**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.08 वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

04.01.16 वेगवेगळ्या साहित्यामध्ये आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा आपल्या लेखनात वापर करतात

.05 .01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधतात.

05.01.12 स्तरानुसार इतर विषय व्यवसायिकाला इत्यादीमध्ये (गणित,विज्ञान,सामाजिक अध्ययन,नृत्यकला,चिकित्सा इत्यादीमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या

सुमन	उत्तर	तट	वर	मित्र

शिक्षकांनी विद्यार्थ्यांनावरील वरील शब्दांचे शब्दकार्ड दाखवून कार्डावरील शब्दांचे वाचन करून घ्यावे.शब्दकार्डावरील प्रत्येक शब्दाचे कोण कोणते अर्थ विद्यार्थ्यांना माहिती आहेत त्याविषयी चर्चा करावी.प्रश्न विचारून शब्दांचे अनेक अर्थ सांगण्याची संधी विद्यार्थ्यांना द्यावी. ते शब्द विद्यार्थांना लिहावयास सांगावे किंवा तोंडी विचारावे .शिक्षकांनी राहिलेल्या शब्दांचे अर्थ स्पष्ट करावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी शब्द कार्ड तयार करावीत . विद्यार्थ्याचे गट करून शब्दकार्डांचे वाचन घ्यावे व एकाच शब्दाचे दोन अर्थ स्पष्ट करावे.

शिक्षकांनी विद्यार्थाकडून पुढील वाक्यांचे प्रकटवाचन घ्यावे.

1. नदीच्या तीरावरून त्याने मारलेला तीर झाडाच्या बुंध्यात रुतला. 2. कधीही हार न पत्कारलेल्या खेळाडूचा सरपंचांनी हार घालून सत्कार केला.
3. मंदारची पुरी खोड मोडली. 4. आंब्याच्या झाडाचे खोड मोठे असते. 5. नावेतील माणसाचे नाव काय आहे? 6. दर महिन्याला पेट्रोलचे दर कमी -जास्त होतात.

यातील अधोरेखित शब्दांचे अर्थ शिक्षक स्पष्ट करतात.

याप्रकारची आणखी उदाहरणे देऊन एकाच शब्दाचे वेगवेगळे अर्थ स्पष्ट करावे. शिक्षकांनी विद्यार्थांकडून शब्दांचे वाक्यात उपयोग करून घ्यावे.

सराव करू या

शिक्षकांनी भिन्न अर्थ असलेले शब्द देऊन त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घ्यावा.

पुढे दिलेले शब्द घेऊन भिन्न अर्थ असलेल्या प्रत्येक शब्दाची दोन वाक्य लिहा. उदा. भाव :- *भाव तेथे देव.

*साखरेचा भाव काय आहे?

१)नाद - ५ .अंक -

२)मान - ६ .पक्ष -

३)ऋण - ७. वावर -

४)वर - ८.जीवन -

कल्पक होऊ या

शिक्षकांनी पुढील कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्या.

१.एकाच शब्दाचे दोन अर्थ असलेले २० शब्दांची यादी करा व प्रत्येकाचे एक एक वाक्य लिहा.

२. आपण बोललेल्या शब्दाचा दुसरी व्यक्ती वेगळाच अर्थ घेते असा अनुभव तुम्हाला आला आहे का ? तुमचा अनुभव आठ ते दहा वाक्यात सांगा किंवा लिहा .

२३

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र-भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता - लेखन** **संकल्पना-प्रत्यय लावून शब्द**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.08 वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

04.01.16 वेगवेगळ्या साहित्यामध्ये आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा आपल्या लेखनात वापर करतात.

05.01.12 स्तरानुसार इतर विषयात (गणित,विज्ञान,सामाजिक अध्ययन,नृत्यकला,चिकित्सा इत्यादीमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या



शिक्षकांनी वरील शब्द फळ्यावर लिहावेत किंवा शब्दकार्ड विद्यार्थ्यांना दाखवावी व त्या शब्दांपासून कोणते नवीन शब्द तयार होतील याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी .विद्यार्थांनी सांगितलेले शब्द शिक्षकांनी फळ्यावर लिहावेत किंवा विद्यार्थ्यांना लिहावयास सांगावेत. राहिलेल्या शब्दापासून तयार होणारे शब्द सांगावेत.

सक्षम बनू या

मानव-मानवता **सुख-सुखकारक** **अर्ज-अर्जदार**

सुंदर-सुंदरता **अपाय-अपायकारक** **धार-धारदार**

शिक्षकांनी वरील शब्द विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे.या शब्दांत कोणता प्रत्यय लावला आहे ते शिक्षकांनी स्पष्ट करावा.प्रत्यय म्हणजे काय व प्रत्यय शब्दाला कोठे जोडतात ते शिक्षकांनी उदाहरणे देऊन स्पष्ट करावे .याप्रमाणे आणखी उदाहरणे घेऊन ते शब्द विद्यार्थ्यांकडून गटात किंवा वैयक्तिकरित्या नवीन शब्द तयार करुन घ्यावे. उदा,अन्याय – अन्यायकारक

शिक्षकांनी प्रत्यय न लावता व प्रत्यय लावून झालेल्या शब्दांचा वाक्यात कसा उपयोग होतो ते प्रत्यक्ष दाखवावे. दोन्ही वाक्याच्या अर्थामध्ये झालेल्या बदलाविषयी विद्यार्थांशी चर्चा करावी किंवा झालेला बदल विद्यार्थांच्या निदर्शनास आणून द्यावा.

सराव करू या	**कल्पक होऊ या**
शिक्षकांनी पुढील कृती द्वारे विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा. १. पुढील शब्दांना 'वान ' हा प्रत्यय लावून नवीन शब्द तयार करा.उदा.भाग्य - भाग्यवान (अ) बल - (आ) धन- (इ) गाडी- (ई) गुण- २. पुढील शब्दांना 'कार' हा प्रत्यय लावून नवीन शब्द तयार करा. (अ)गीत+कार= (आ) चित्र+कार= (इ) नाटक+कार= (ई) कला+कार	१. शब्दाला प्रत्यय लावल्यानंतर वाक्याचा अर्थ बदलतो का ? हे प्रत्यक्ष वाक्य लिहून तपासा. उदा. अर्ज-अर्जदार २.प्रत्यय असलेले शब्द तुम्हाला कोठे कोठे पाहायला मिळतात.ते शोधा व वहीत लिहा

SCERT MAHARASHTRA PUNE

इयत्ता- पाचवी विषय-मराठी

२४

क्षेत्र- लेखन संकल्पना- चित्रावरून गोष्टलेखन

अध्ययन निष्पत्ती-

चौथी :- आपल्या कल्पकतेनुसार गोष्ट,कविता ,वर्णन इत्यादी लिहिताना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात.

पाचवी:- आपल्या कल्पनेने कथा, कविता ,पत्र इत्यादी लिहितात. कथा ,कविता यांमध्ये स्वत:च्या शब्दांची भर घालून लेखन करतात

जाणून घेऊ या

शिक्षकांनी इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकातील पान क्रमांक 62 व 63 वरील पुढील चित्रांचे निरीक्षण विद्यार्थ्यांना करायला सांगावे व चित्रांच्या आधारे गोष्ट लिहिण्यास सांगावी.

पुढील सूचना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावी.(चित्रे पहा व चित्रांच्या आधारे गोष्ट लिहा.





शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेली गोष्ट वाचावी व चित्रांच्या आधारे,चित्रांचे निरीक्षण करून, त्यात घडलेली घटना ओळखून तसेच चित्रांच्या वर्णनासाठी वाक्ये तयार करून ,विद्यार्थ्यांना घटनाक्रमद्वारे गोष्ट लिहिता येते की नाही हे पाहावे.

सक्षम बनू या

शिक्षक विद्यार्थ्यांना चित्रांच्या सहाय्याने गोष्ट कशी तयार करायची याबद्दल मार्गदर्शन करतील.

1)सुरुवातीला चित्रांचे बारकाईने निरीक्षण करावे.

2)पहिल्या चित्रापासून शेवटच्या चित्राचे क्रमाने निरीक्षण करत जावे.

3)क्रमाने निरीक्षण केल्यानंतर काय घटना घडली असेल? याचा बारकाईने विचार करावा.

4)काय घटना घडली? हे निश्चित झाल्यानंतर पहिल्या चित्राकडे जावे व बारकाईने निरीक्षण करावे.

5) प्रत्येक चित्राचे दोन ते तीन वाक्यांमध्ये वर्णन लिहावे.

6)चित्रांचे वर्णन करत असताना चित्रामध्ये काय दिसत आहे व चित्रामागे काय आहे हेही बारकाईने जाणून घेऊन वर्णन लिहावे.

7)चित्रात व्यक्ती,प्राणी,मुले दिसत असतील तर त्यांना तुमच्या आवडीची नावे द्यावीत.


8)गोष्ट प्रभावी होण्यासाठी काही संवादात्मक वाक्ये समाविष्ट करावीत व योग्य विरामाचिन्हे वापरावीत.

9 गोष्ट पूर्ण झाल्यावर गोष्टीला नाव द्यावे.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील चित्रे दाखवावीत व चित्रांच्या आधारे गोष्ट लिहिण्यास सांगावी.पुढील प्रमाणे सूचना विद्यार्थ्यांना द्यावी.

(पुढे दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करा व आत्ता सांगितलेल्या सूचनांप्रमाणे चित्रांच्या आधारे गोष्ट तयार करून ती लिहा.गोष्टीला नाव द्या.



कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांनी नुकत्याच ऐकलेल्या/पाहिलेल्या/अनुभवलेल्या कोणत्याही एका घटनेबाबत घटनाक्रमानुसार क्रमाने विद्यार्थ्यांना येतील तशी चित्रे काढण्यास सांगावीत .चित्रांचे निरीक्षण करण्यास सर्व सांगावे व चित्रांच्या आधारे गोष्ट तयार करून ती लिहिण्यास व गोष्टीला नाव देण्यास सांगावे.

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

२५

क्षेत्र- लेखन **संकल्पना- मुद्द्यांवरुन गोष्ट लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

४थी :- आपल्या कल्पनेनुसार गोष्ट ,कविता,वर्णन इ. लिहिताना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात.

५वी :- आपल्या कल्पनेने कथा,कविता, पत्र इत्यादी लिहितात .

कथा कविता यांमध्ये स्वतःच्या शब्दांची भर घालून लेखन करतात

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील **मुद्दे** गोष्ट लेखनासाठी फळ्यावर लिहून द्यावेत. शिक्षकांनी पुढील मुद्द्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना गोष्ट लिहिण्यास व ती लिहून झाल्यावर गोष्टीला योग्य असे नाव देण्यास सांगावे.

चिंगी -डिंक गोळा करण्यासाठी जंगलात जाते-रस्ता चुकते-रस्ता सापडत नाही-अधिक घनदाट भाग-सायंकाळ-घराची आठवण व आईबाबांची काळजीचा विचार-घाबरते-वनखात्याचे कार्यालय- वनकर्मचारी घरी आणून सोडतात-आईबाबा आनंदी.

वरील मुद्द्यांवर आधारित विद्यार्थ्यांकडून गोष्ट लिहून घ्यावी.विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या गोष्टी वाचाव्यात व विद्यार्थ्यांना मुद्द्यांवर आधारित गोष्ट लिहिता येते की नाही हे त्यावरून जाणून घ्यावे.

आहे का? त्यावरून क्रियापदांची ओळख व क्रियापदांचा लेखनातील वापर यासंबंधी विद्यार्थ्यांना जाणून घ्यावे

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गोष्ट लिहिण्याविषयी व ती लिहिताना मुद्द्यांच्या वापरासंबंधी पुढीलप्रकारे मार्गदर्शन करावे.

1)मुद्द्यांमध्ये दिलेल्या व्यक्तींचे सविस्तर वर्णन करावे(नाव,बाह्यरूप, स्वभाव)

2)मुद्द्यांमध्ये स्थळ(निसर्ग, गाव,बाजार,शाळा, बाग वगैरे)दिले असेल तर त्या स्थळाचे वर्णन करावे.

3)मुद्द्यांवरून गोष्टीची मध्यवर्ती कल्पना निश्चित करावी

4)गोष्ट पूर्ण होण्यासाठी संबंधित पात्रांची निवड करावी ,पात्रे मर्यादित असावेत.

5)मुद्द्यांचे बारकाईने निरिक्षण करून घटनेचा क्रम निश्चित करावा.

6)घटनेची सुरुवात- समस्या - समस्येची सोडवणूक - समाधानकारक शेवट असा सर्वासाधारण क्रम असावा.

7)गोष्टीला अनुरूप नाव द्यावे.

(थोडक्यात :-कथेची सुरुवात - - - कथेचा मध्य - - - कथेचा शेवट

(कथेला या सर्व बाबी असतात. तर या प्रत्येक बाबीचा विचार करत असताना कथेची भाषा, पात्र,प्रसंग, कथेमध्ये एक समस्या निर्माण होते ती हळूहळू सुटत जाते.आणि शेवट होतो अशी कथा आम्हाला लिहायची आहे. त्यासाठी खालील मुद्यांच्या आधारे आपण कथा लिहू शकतो.)

गोष्टीचा मध्य/समस्या/अडचण

अडचण/सुटण्यास सुरुवात ,उपाय सापडणे

गोष्टीची सुरुवात (स्थळ व पात्राचे वर्णन) ,समस्या सुटणे , गोष्टीचा शेवट

सराव करू या **शिक्षकांनी पुढील मुद्दे फळ्यावर थोडक्यात लिहून ग्राफ फळ्यावर काढावा व** **विद्यार्थ्यांना गोष्ट लिहिण्यास सांगावी..** शेतकरी- आंब्याची बाग लावली- शेळ्या-मेंढ्या आंब्याची झाडे खाऊ लागली-बागेला निवडुंगाचे कुंपण- बागेला संरक्षण-बाग मोठी झाली- खूप आंबे -खूप उत्पन्न -शेतकऱ्याचा मुलगा मोठा झाला- बाग व बागेचा जमाखर्च - मुलगा मूर्ख व अविचारी-निवडुंगाचा उपयोग नसल्याने निवडुंग तोडतो- बागेतील झाडांची शेळ्या -मेंढ्या व लोकांकडून फळांची चोरी व नासधूस- उत्पन्न कमी-चूक कळते	**कल्पक होऊ या** 1)शिक्षकांनी पुढील शब्दांच्या आधारे विद्यार्थ्यांना गोष्ट लिहायला सांगावी. (बाग ,डबा, शाळा ,संध्याकाळी) 2) शिक्षक एका गोष्टीची सुरुवात फळ्यावर लिहून देतील व यावरून गोष्ट पूर्ण करण्यास सांगतील धान्याची पोती भरलेली बैलगाडी घेऊन खंडेराव बाजाराच्या गावाला निघाले होते.गाव मागे टाकून ते एका चढावर पोचले आणि अचानक बैल जागीच थांबले.काही केल्या पुढे जाईनातच.....

SCERT MAHARASHTRA

इयत्ता- पाचवी विषय-मराठी

२६

क्षेत्र- लेखन संकल्पना- सूचनाफलक

अध्ययन निष्पत्ती-

चौथी:- विशिष्ट परिस्थिती आणि उद्दिष्ट (विविध प्रकारच्या फलकांवर लावल्या जाणाऱ्या सूचना,सामानाची सूची, कविता ,गोष्टी पत्र, इत्यादी) लक्षात घेऊन लेखन करतात.

पाचवी:- 1)भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

2) आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्याबाबत लिखित स्वरूपात आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात .

3)पाठ्यपुस्तक आणि इतर लेखनप्रकारातील विविध विषयावर लिखित स्वरूपात/ब्रेल लिपीमध्ये अभिव्यक्त होतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पुढील वाक्ये फळ्यावर लिहावीत व विद्यार्थ्यांना वाचायला सांगावीत आणि (विचार करण्यास वेळ द्यावा.)

1) रस्त्यावर कचरा टाकू नये.

2)मी दररोज सकाळी लवकर उठतो.

3)झाडांची फुले तोडू नयेत.

4)ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके वेळेवर जमा करावीत.

5) सचिन गावाला गेला.

6)जॉन अभ्यास करत आहे.

7) चप्पल/शूज स्टॅन्डवर व्यवस्थित ठेवावेत.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलपैकी सूचना असलेली वाक्ये कोणती, त्या वाक्यांचा क्रमांक विद्यार्थ्यांना लिहायला सांगावा.

याअगोदर तुम्ही कुठेकुठे अशाप्रकारे वेगवेगळ्या सूचना वाचल्या आहेत त्या ठिकाणांची यादी विद्यार्थ्यांना करायला सांगावी.

सार्वजनिक ठिकाणी सूचना का लिहिल्या जातात ते लिहा/सांगा ?

अशाप्रकारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध ठिकाणच्या सूचनांबद्दल कितपत माहिती आहे हे जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

सूचनांबाबत विद्यार्थ्यांची समज लक्षात घेऊन शिक्षकांनी खालीलबाबतीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

1)सार्वजनिक ठिकाणी सूचना का लिहिल्या जातात याबाबत शिक्षकांनी व विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

2)सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचनांचे पालन करणे का गरजेचे आहे?त्याचे फायदे काय होतात ते सांगावे.

3)बस स्थानक, रेल्वे स्टेशनवर बाजार अशा गर्दीच्या ठिकाणी लावलेल्या सूचनांमुळे प्रवाशी व रेल्वे प्रशासन यांना काय फायदा होतो याबाबतीत माहिती सांगावी.

4)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना कशा असाव्यात,त्यांची वाक्यरचना,प्रभावी भाषा,नेमकेपणा,आकर्षकता यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे

5)वेगवेगळ्या ठिकाणी लिहिल्या गेलेल्या सूचना फलकांचे नमुने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दाखवावेत.

6)सार्वजनिक वाहतूक, ठिकाणे,साथीचे रोग,आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता याबाबत सूचनाफलकांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगावे.

7) सूचनाफलक तयार करताना वापरावयाचे शब्द ,यमक ,भाषा ,वाक्यरचना याबद्दल तसेच सूचनाफलक कुठे लावावेत जेणेकरून अधिकाधिक लोकांना दिसतील याबाबत विद्यार्थ्यांना माहिती द

द्यावी..

सराव करू या **शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लसीकरण केंद्रावर होणारी गर्दी लक्षात घेता सुरक्षित लसीकरण सूचनाफलक तयार करायला सांगावा.**	**कल्पक होऊ या** **शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून सूचनाफलकाबाबत पुढील कृती करून घ्यावी.** **कोरोनाची लक्षणे आढळल्यास घ्यावयाची काळजी व पुढील उपाय याबाबत कागद व रंग यांच्या साहाय्याने आकर्षक सूचनाफ़लक तयार करा व तुम्ही रहात असलेल्या परिसरात तो फलक लावा.**

SCERT MAH

२७

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **कौशल्य / संकल्पना - निमंत्रणपत्रिका वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक ,प्रसिद्धीफलक इ.) यांचे समजपूर्वक वाचन करतात.

05,01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी (फलकावरील सूचना,कार्य अहवाल,माहिती मिळविण्यासाठी इ)वाचतात.लिहितात.

जाणून घेऊया



शिक्षक विद्यार्थ्यांना पुढील निमंत्रणपत्रिका वाचण्यास सांगतात.वाचन करून झाल्यावर प्रश्न विचारतात.(शिक्षकांनी उपलब्ध पत्रिका वापरावी.) मुलांनी निमंत्रणपत्रिका वाचून पुढील प्रश्नांची उत्तरे सांगावीत.

प्रश्न : १) निमंत्रणपत्रिका कशाची आहे?

२) कार्यक्रम कोणी आयोजित केला आहे?

३)कार्यक्रम कधी आहे?

४)कार्यक्रमाची वेळ आणि ठिकाण कोणते?

५)कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कोण आहेत?

सक्षम बनू या

शिक्षकांनी पत्रिकेचे प्रकटवाचन करून दाखवावे. निमंत्रणपत्रिका वेगवेगळ्या प्रकारच्या असतात हे सांगावे.निमंत्रणपत्रिकेची गरज का असते ते सांगावे.वेगवेगळ्या निमंत्रणपत्रिका हाताळायला दयाव्यात . निमंत्रणपत्रिका कशी वाचावी व वाचताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे हे पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करतात.

- निमंत्रण कोणाकडून आले. कार्यक्रमाचे पाहुणे
- कार्यक्रमाचे वेगळेपण कार्यक्रमाची तारीख ,वेळ व स्थळ
- कार्यक्रम कशा संदर्भात आहे ?

सराव करू या

१)शिक्षकांनी इ.४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं.५२ वरील निमंत्रणपत्रिकेचे वाचन करण्यास सांगावे.. वाचल्यानंतर पत्रिकेवर आधारित प्रश्न विचारावे.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी मुलांकडून पुढील प्रकारच्या कृती करून घ्यावयात.

१)तुमच्या शाळेत होणाऱ्या "वृक्षारोपण" कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका तयार करा.

२)वेगवेगळ्या प्रकारच्या निमंत्रणपत्रिका गोळा करा.

२८

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **कौशल्य / संकल्पना - उतारा वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.10 वाचलेल्या रचनेमधील मुख्य विषय ,घटना,चित्र,पात्र, शीर्षक यांसंबधी चर्चा करतात.प्रश्न विचारतात,आपले मत व्यक्त करतात,आपले म्हणणे पटवून देतात.

05.01.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी साहसी,सामाजिक विषयावरीलकथा ,कविता इ.)विषय घटना ,चित्र,पात्र,व शीर्षक याबाबत चर्चा करतात प्रश्न विचारतात,आपले मत देतात,तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे काळजीपूर्वक वाचन करण्यास सांगावे. व उताऱ्यावर आधारित प्रश्न विचारावेत.प्रश्नामध्ये विविधता असावी.

निसर्ग हा महान जादुगार आहे. त्याचे चमत्कार ,त्याच्या लीला अगाध आहेत.निसर्ग प्रसन्न ,रमणीय सौंदर्यशील आहे.त्याच्या संगतीत असताना कळत- नकळत आपण खूप काही शिकत असतो. आपण अंतर्मुख होतो.विचार करू लागतो.दुथडी भरून वाहणारी नदी , उडी घेणारे जलप्रघात ,वाहता झरा, खळखळणारे ओढे हे सारे आपल्याला जणू ' पुढे जात राहा ' असा संदेश देत राहतात .आसमंत गंधित करणारे सुगंधी फूल ,रिझवणारा झरा ,शेतात छाया देणारा,रसाळ फळे देणारा वृक्ष , आपल्यावर कृपेची बरसात करणारा मेघ हे सारे आपल्याला 'देते व्हा ' ,'देण्यातला आनंद लुटा ' हा कानमंत्र देत राहतात .

प्रश्न : पुढील प्रश्न काळजीपूर्वक वाचा व अचूक उत्तरे द्या .

१)निसर्ग आपल्याला कोणता संदेश देतो?

२)फळे,फुले,मेघ आपल्याला कोणता संदेश देतात?

३)पुढील शब्दांचे समानार्थी शब्द सांगा. नदी,छाया ,वृक्ष ,मेघ

४)पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द सांगा.सुंगंधी,पुढे ,आनंद

५)निसर्गाची हानी होऊ नये म्हणून तुम्ही काय काळजी घ्याल.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरील प्रमाणे विविध विषयावर आधारित उतारे विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून द्यावे.वाचताना कोणती काळजी घ्यायची हे सांगावे..उताऱ्यात आलेल्या घटना ,संवाद आणि आशय या गोष्टी वाचताना समजून घ्यायच्या असतात, हे सांगावे. तसेच उताऱ्यात आलेले नवीन शब्द,जोडशब्द ,वाक्यप्रचार ,म्हणी इ.बाबींकडे वाचताना लक्ष द्यावे ,हे शिक्षकांनी स्पष्ट करावे .

सराव करू या	कल्पक होऊ या
१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना इ.४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं-२१,२५,,३६,४८, वरील उतारे प्रत्येक गटात वाचनास द्यावे.तसेच त्या उताऱ्यावर आधारित काही ४ प्रश्न तयार करण्यास सांगावे . २)विद्यार्थ्यांनी उतारा वाचल्यानंतर तयार केलेल्या प्रश्नांची उत्तरे वहीत लिहावीत .	१) इ.४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं ३६ वरील उतारा पूर्णपणे व काळजीपूर्वक वाचण्यास सांगावी व त्यात आलेले वाक्यप्रचार शोधून व त्याचा अर्थ लक्षात घेऊन वाक्यात उपयोग करण्यास सांगावे.

SCERT MAHARASHTRA

२९

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **कौशल्य / संकल्पना - माहितीपर वाचन**

अध्ययन निष्पत्ती :

04.01.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे समजपूर्वक वाचन करतात.

05.01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी (फलकावरील सूचना,कार्यअहवाल ,माहिती मिळवण्यासाठी)वाचतात,लिहितात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उतारा वाचायला देतात. व पुढील प्रश्न विचारून उताऱ्यातील माहिती समजली की नाही हे पहातील.

सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या शिक्षिका , स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या ,अनाथ मातांच्या कैवारी ,निराधा र बालकांच्या माता ,विधवा विवाहाच्या पुरस्कर्त्या,स्त्री-पुरुष समानतेच्या प्रणेत्या म्हणून ओळखल्या जातात.त्यांच्या जन्म सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ रोजी झाला.त्यांच्या वडिलांच्या नाव खंडोजी नेवसे पाटील .सावित्रीबाईना तीन भाऊ होते.सावित्रीबाई आईबाबांबरोबर शेतावर जात असे.आणि आईला घरकामातही मदत करत असत.

प्रश्न : १) सावित्रीबाईचा जन्म कोणत्या जिल्ह्यात झाला ?

२) सावित्रीबाईच्या वडिलांचे नाव काय होते ?

३)भारतातील पहिल्या महिला शिक्षिका कोण होत्या ?

४) सावित्रीबाईचा जन्म कोणत्या साली झाला ?

५) सावित्रीबाई कोणासोबत शेतावर जात असे ?

६) सावित्रीबाईना स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या का म्हटले असेल?

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे माहितीपर उतारे वाचनासाठी उपलब्ध करून द्यावेत.वाचताना उताऱ्यात कोणती माहिती दिली आहे ,उताऱ्याचे शीर्षक कोणते ...याकडे लक्ष द्यावे ,हे स्पष्ट करतात.उताऱ्यात आलेले नवीन शब्द ,जोडशब्द याकडेही लक्ष द्यावे हे सांगतात.काही प्रश्न शिक्षकांनी स्वतः द्यावेत तर काही प्रश्न मुलांना तयार करायला सांगावेत.सर्व प्रश्न एकत्रित करून मुलांमध्ये चर्चा घडवून आणावी. उताऱ्यातील विषयावर अधिकची माहिती मिळविण्यास मुलांना मदत करावी.

सराव करू या

शिक्षकांनी इ .५ वी पाठ्यपुस्तकातील पान.नं – ४० वरील उतारा विद्यार्थ्यांना वाचनास द्यावा.त्यावर आधारित प्रश्न विचारावेत

कल्पक होऊ या

शिक्षक पुढील कृती मुलांकडून करून घेतील.

१)वाचनालयातील माहितीपर पुस्तके शोधा व ती वाचा २)पुढील विषयावर ४-५ ओळींचे उतारे तयार करा व ते उतारे कार्डशीटवर लिहून वर्गात लावा. रोज त्याचे वाचन इतर मुलांकडून करून घ्यावे.

उदा .शिवाजी महाराज , संत ज्ञानेश्वर

जननायक बिरसा मुंडा , करोना काळातील शाळा,

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

३०

सेतु अभ्यास चाचणी क्रमांक -२

विषय – मराठी

इयत्ता- पाचवी

विद्यार्थ्याचे नाव : -

एकूण गुण : १०

प्र.१: रिकाम्या जागी कंसात दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप लिहा.(गुण-१)

• पुढील वर्षी मी दहावीची परीक्षा.....(देणे).

प्र.२: पुढील वाक्यात योग्य ठिकाणी स्वल्पविराम देऊन वाक्य परत लिहा..(गुण-१)

•आमच्या बागेत मोगरा गुलाब जास्वंद सोनचाफा ही फुले आहेत.

प्र.३: योग्य विरामचिन्हे वापरलेला पर्याय निवडा.(गुण - १)

१) "गुरुजींनी मुलांना विचारले", तुमचे छंद कोणते ?

२) गुरुजींनी मुलांना विचारले , " तुमचे छंद कोणते."

३) गुरुजींनी मुलांना विचारले , तुमचे छंद कोणते ?"

४) गुरुजींनी मुलांना विचारले ; "तुमचे छंद कोणते !"

प्र.४: विदरभात श्रावण महिन्यात बेलपोळा सन साजरा करतात.(गुण -१)

वरील वाक्यात किती शब्द चुकीचे आले आहेत.

१) दोन. २)तीन. ३)चार

प्र.५: वाक्यातील अधोरेखित शब्द ज्या अर्थाने वापरला आहे त्या अर्थाचा पर्याय ओळखा.(गुण-१)

• खेळताना पडल्याने राजूची पाठ दुखवली.

१) परिपाठ. २) धडा. ३) शरीराचा अवयव

प्र.६: पुढील शब्दाला ' दार ' हा प्रत्यय लावून नवीन शब्द तयार करून लिहा.(गुण - १)


१)माल -.....२)किल्ले - .....

SCERT MAHARASHTRA PUNE

प्र.७:'कड्याजवळ असलेल्या कठड्यावर चढू नका.' ही सूचना कोणत्या ठिकाणी आढळून येते?.(गुण-१)

१) दुकानात २) किल्ल्यावर ३) दवाखान्यात

•पुढील उतारा वाचा व खालील प्र.क्र.८ ते १० प्रश्नांची उत्तरे लिहा.



जोतीराव फुले 'पुणे' येथे राहत. ते गोरगरीब लोकांची सेवा करीत. सर्वांनी लिहायला – वाचायला शिकावे, असे त्यांना वाटे. शिक्षण घेतले की ज्ञान मिळते, ज्ञान मिळाले की गरिबी दूर होते, माणूस विद्येने मोठा होतो; म्हणून आपण शिकले पाहिजे, असे ते सांगत.

जोतीरावांच्या पत्नी म्हणजे सावित्रीबाई शिकलेल्या नव्हत्या. जोतीराव सावित्रीबाईंना म्हणत, "एक पुरुष शिकला; तर तो एकटा शहाणा होतो; पण एक बाई शिकली, तर सगळं कुटुंब शहाणं होतं."

प्र.८ : जोतीराव फुले कोठे राहत?.(गुण-१)

१) सातारा. २) कोल्हापूर. ३) पुणे

प्र.९:कोणाच्या शिकण्यामुळे सगळं कुटुंब शहाणे होते?.(गुण-१)

१) पुरुषाच्या २)स्त्रीच्या ३) समाजाच्या

प्र.१०:जसे गोरगरीब; तसे दीन……..(गुण-१)

१)रात्र. २) दुबळे. ३) गरीब

SCERT MAHARASHTRA PUNE

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

३१

क्षेत्र – वाचन **कौशल्य / संकल्पना - कथावाचन**

निष्पत्ती :

04.01.09 वाचायला उत्सुक असतात.आणि वाचनकोपरा / ग्रंथालयातील आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्याचे वाचन करतात.

05.01.01 ऐकलेल्या,वाचलेल्या साहित्यातील विषय,चित्र,घटना ,पात्र,शीर्षक याबाबत चर्चा करतात.तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

जाणून घेऊया

शिक्षक विद्यार्थ्यांना वाचनालयातील बोधपर गोष्टीची पुस्तके वाचण्यास देतील.आणि वाचलेल्या गोष्टीतून कोणता बोध होतो हे सांगण्यास सांगावे.

सक्षम बनू या

शिक्षक मुलांना वाचनालयातील गोष्टीची पुस्तके उपलब्ध करून देतात.वाचताना गोष्टीचे शीर्षक,गोष्टीतील पात्र,आशय याकडे लक्ष देण्यास सांगतात.गोष्टीत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ लक्षात घेऊन वाचण्यास सांगतात.गोष्टीतून कोणता बोध होतो या कडे वाचताना लक्ष देण्यास सांगतात.

सराव करू या

शिक्षकांनी **"अकबर –बिरबल** " हे गोष्टीचे पुस्तक घेऊन प्रत्येक मुलाकडून एक एका गोष्टीचे प्रकट वाचन करून घ्यावे. ऐकलेल्या गोष्टीवर उरलेली मुले प्रश्न विचारतील.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी काही अपूर्ण गोष्टीं लिहिलेली कार्ड बनवावीत ती मुलांना वाचायला द्यावीत.आणि त्यांना उर्वरित गोष्ट बनविण्यास सांगावीत.पूर्ण झालेली गोष्ट वहीत लिहिण्यास सांगावी.

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

३२

क्षेत्र – वाचन **कौशल्य / संकल्पना -शब्दशोध पाटी वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.06 वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव यांची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी/लेखी स्वरुपात व्यक्त करतात .

04.01.07 पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक,प्रसिद्धी फलक)यांचे समजपूर्वक वाचतात.

05.01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी वाचातात व लिहितात.

जाणून घेऊया

- **शिक्षकांनी मुलांना पुढील शब्द शोधपाटी दाखवून त्यात खालील दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द शोधण्यास सांगावे .**

वृ	सा	पा	ल	रा
क्ष	ग	ज	ख	न
दू	र	ग	ध	रू
दि	स	री	ता	प
ह	न	ब	छा	या

खालील शब्दांचे समानार्थी शब्द शोधा.

पक्षी - **सावली –**

जंगल - **दिवस –**

लांब - **समुद्र –**

नदी - **दीन -**

पाणी - **झाड -**

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध प्रकारच्या शब्द शोधपाट्या तयार करून त्या विद्यार्थ्यांना शोधण्यास द्यावे .त्याद्वारे वेगवेगळ्या शब्दांचे वाचन होईल.विशेषतः वाचनात मागे पडलेल्या मुलांसाठी याचा जास्तीजास्त सराव शिक्षकांनी घ्यावा.उदा. फुलांची नावे, प्राणी-पक्ष्यांची नावे,उलट अर्थी शब्द,म्हणी

सराव करू या

शिक्षकांनी इ.४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं.६0वरील शब्दशोध पाटी पहाण्यास सांगावे. व त्यात लपलेल्या म्हणी शोधून शोधलेल्या म्हणी वहीत लिहिण्यास सांगावे.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी मुलांना फळांची नावे लपलेली शब्द शोधपाटी तयार करण्यास सांगावी.

३३

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र – वाचन **संकल्पना - कोडी**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.06 वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव यांची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी/लेखी स्वरुपात व्यक्त करतात .

04.01.07 पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक,प्रसिद्धी फलक)यांचे समजपूर्वक वाचतात.

05.01.05 भिन्न परिस्थितीत आणि उद्देशासाठी वाचातात व लिहितात

जाणून घेऊया

शिक्षकांनी खालीलप्रमाणे कोडी वाचण्यास द्यावी व उत्तरे शोधण्यास सांगावी.

कोडं - काळा काळा रंग , वस्तू कुरतडण्यास दंग
मनीमाऊ येताच पळून जातो
आणि बिळात जाऊन दडून बसतो.

ओळखा पाहू कोण ?

सक्षम बनू या

हिरवा, पिवळा रंग.....
आहे आंबट गोड चव माझी.....
आहे क जीवनसत्व भरपूर.....
गाव माझं नागपूर.....

ओळखा पाहू मी कोण?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारची कोडी वाचायला द्यावीत. विद्यार्थी त्यांच्या पूर्वानुभवावरून त्याचे उत्तर शोधतील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तर शोधण्यास अडचण येईल त्यांना शिक्षक मदत करतील.

सराव करू या

१) शिक्षक मुलांना इ.४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पान नं ३२ वरील कोड वाचण्यास सांगतील व त्याचे उत्तर शोधण्यास सांगा.

२)शिक्षक मुलांना खालील कोडी वाचून ओळखण्यास सांगतात.

१) काळ्या राणी उभी तलवार.
२) सगळीकडे आहे,जाणवते पण दिसत नाही.
३)दोन भाऊ शेजारी , भेट नाही संसारी.

कल्पक होऊ या

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना २ कोडी बनविण्यास सांगावी.

२) वेगवेगळ्या कोड्यांचा संग्रह बनविण्यास सांगावेत.

३४

इयत्ता- पाचवी **विषय**-मराठी

क्षेत्र- भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता** - भाषण –संभाषण,वाचन, लेखन **संकल्पना**-समानार्थी शब्द


अध्ययन निष्पत्ती-

04.01.08 वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.

05.01.10.भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या



- **शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील चित्र दाखवून चित्राचे निरीक्षण करावयास सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे.**
- **चित्रातील कोणत्या शब्दांना पर्यायी/समानार्थी शब्द वापरता येतील ते शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारावे व त्याची यादी विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावी.**
- **त्यानंतर शिक्षकांनी चित्रातील शब्दांचे समानार्थी शब्द लिहावयास सांगावे किंवा तोंडी विचारावे. राहिलेल्या शब्दांचे अर्थ स्पष्ट करावेत.**

सक्षम बनू या

शिक्षकांनी समानार्थी शब्द म्हणजे काय ते उदाहरणे देऊन स्पष्ट करावे.

पुढील वाक्ये वाचा व अधोरेखित शब्दाचा समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा सांगा किंवा लिहा.

1.रमेश माझा मित्र आहे. २.माझी आई माझा अभ्यास घेते.

३.मी रोपांना पाणी घातले. ४.सूर्य पूर्वेला उगवतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढील कविता म्हणून घ्यावी.

उदा. देवा तुझे किती सुंदर आकाश

सुंदर प्रकाश सूर्य देतो

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेतील शब्दांसाठी पर्यायी /समानार्थी शब्द शोधण्यास सांगावे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेतील शब्दांना शोधलेले पर्यायी शब्द कवितेत मूळ शब्दाच्या जागी घालायला सांगावे .

परमेश्वरा तुझे किती छान गगन

छान उजेड रवी देतो

असे करताना मूळ कवितेचा अर्थ बदलतो का याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी .

सराव करू या	कल्पक होऊ या
१.शिक्षकांनी विद्यार्थांचे गट करून शब्दकार्डांच्याद्वारे समानार्थी शब्दांचा सराव घ्यावा. २.शिक्षकांनी पान क्रमांक ४७ व ५१ वरील समानार्थी शब्दांचा स्वाध्याय सोडविण्यास सांगावा.	शिक्षकांनी पुढील कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. १.तुमच्या आवडीचे गाणे किंवा कविता घेवून त्यातील कोणत्या शब्दांचे समानार्थी शब्द सांगता येईल ते शोधा व ते कवितेत घालून कविता वाचा.कवितेचा अर्थ बदलतो का ते पहा

SCERT MAHARA

३५

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता-लेखन** **संकल्पना-जोडशब्द**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.08 वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

04.01.16 वेगवेगळ्या साहित्यामध्ये आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा आपल्या लेखनात वापर करतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधतात.

05.01.12 स्तरानुसार इतर विषयात (गणित,विज्ञान,सामाजिक अध्ययन,नृत्यकला,चिकित्सा इत्यादीमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी काही शब्द फळ्यावर लिहून त्या शब्दांना जोडून येणारे शब्द कोणते ते विद्यार्थ्यांना विचारावे.

उदा.आरडा , केर,शेती इ.

किंवा

शिक्षकांनी अर्धे असलेले जोडशब्द यांची शब्दकार्ड घ्यावे व शब्दकार्ड असलेल्या गटातून उरलेला शब्द विद्यार्थ्यंना शोधायला सांगावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी काही जोडशब्द फळ्यावर लिहावे ते शब्द विद्यार्थ्यांना वाचायला सांगावे .त्यानंतर काही अर्धे शब्द लिहून त्या शब्दांना कोणते शब्द जोडता येतील याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.जोडून येणारे शब्द कसे असतात , ते कसे तयार होतात याची उदाहरणे देऊन शिक्षकांनी स्पष्ट करावे .

एकाच शब्दाची पुनरावृत्ती असलेले जोडशब्द

एक अर्थपूर्ण व दुसरा निरर्थक असलेले जोडशब्द

दोन वेगळी व एकाच गटातील नामे

एकाच अर्थाचे दोन शब्द याची उदाहरणे देतील.

उदा.हिरवेहिरवे ,ओबडधोबड, शंखशिंपले, पांढराशुभ्र इ.

शिक्षकांनी यासारख्या जोडशब्दांचे वाक्यात उपयोग करुन दाखवावा.विद्यार्थ्यंना जोडशब्द तयार करायला सांगावे व त्यांचा वाक्यात उपयोग करायला सांगावे.

सराव करू या	कल्पक होऊ या
१.शिक्षकांनी खालील प्रकारच्या उदाहरणांचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घ्यावा. अ) पुढील जोडशब्द पूर्ण करा. १.पाला- २.धन- ३.काना- ४.आरडा- २.शिक्षक अर्ध्या - अर्ध्या जोडशब्दांच्या शब्दकार्डातून योग्य जोडशब्दाची जोडी विद्यार्थ्यांना शोधायला सांगतील उदा.१.मीठ-साखर,भाकर,गोड (मीठभाकर) ३.जोडशब्दांच्या योग्य जोड्या लिहा. १.काम अ.गोटा २.चारा आ.धंदा ३.दाणा इ.पाणी	एका शब्दाची पुनरावृत्ती असलेले जोडशब्द शोधून त्याची यादी करा व त्याचा वाक्यात उपयोग करा. उदा.हिरवेहिरवे,दिवसेंदिवस,रातोरात

SCERT MAHARASHTRA

३६

इयत्ता- पाचवी विषय-मराठी

क्षेत्र- भाषाभ्यास कौशल्य/क्षमता -वाचन संकल्पना- म्हणी

अध्ययन निष्पत्ती-


04.01.08 वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

04.01.16 वेगवेगळ्या साहित्यामध्ये आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा आपल्या लेखनात वापर करतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधतात.

05.01.12 स्तरानुसार इतर विषय व्यवसायिकाला इत्यादीमध्ये (गणित,विज्ञान,सामाजिक अध्ययन,नृत्यकला,चिकित्सा इत्यादीमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या



शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही चित्र दाखवून त्याचे निरीक्षण करावयास सांगावे .चित्रावरून म्हणी ओळखण्यास सांगावे .

शिक्षकांनी म्हणी असलेला चार पाच ओळींचा उतारा किंवा चार पाच वाक्ये फळ्यावर लिहावा व त्यातील म्हणी ओळखण्यास सांगावे.

किंवा

शिक्षकांनी अर्धी म्हण सांगावी किंवा लिहावी उरलेली अर्धी म्हण विद्यार्थ्यांना पूर्ण करण्यास सांगावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी म्हणीचा समावेश असलेली गोष्ट किंवा परिच्छेद विद्यार्थ्यांना ऐकवावी. गोष्टीत/परिच्छेदात कोणकोणत्या म्हणींचा उल्लेख आला आहे हे विद्यार्थांना विचारावे.यासारख्या म्हणी विद्यार्थ्यांनी कोठे पहिल्या / ऐकल्या आहेत याविषयी विद्यार्थांशी चर्चा करावी, शिक्षकांनी म्हणी व त्यांचे अर्थ स्पष्ट करावा. म्हणींचा बोलताना व लिहिताना कसा वापर करतात हे स्पष्ट करावे. म्हणींचा वाक्यात उपयोग कसा करतात ते विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष करून घ्यावे.

शिक्षकांनी म्हणीचे चित्रकार्ड,म्हणी व म्हणींचे अर्थ असलेले शब्दकार्ड यांचा वापर करुन विद्यार्थ्यांकडून म्हणींचा सराव विद्यार्थ्यांचे वैयक्तिक किंवा गट करून घ्यावा.

सराव करू या

(अ) शिक्षकांनी पुढील अक्षरकार्डे फळ्यावर लिहून किंवा दाखवून अक्षर गटापासून म्हणी तयार करून लिहावयास सांगावे.

1. पा ला ळा ण्या फा ख ट थ ख ळ उ र
2. र रा सा ज मां उं द ला श
3. भा दे व ते व थे

(आ) पुढील शरीराच्या अवयवावरून एक एक म्हण तयार करून लिहा .

१ जीभ - २. पाय - ३. तोंड - ४. कान - ५. हात -

(इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून म्हण तयार करा.

१. नाचता येईना .....वाकडे,

२.पळसाला पानं .....

३.....चे घर खाली.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्याव्या.

१.तुमच्या परिसरातील किंवा तुमच्या कुटुंबातील लोक बोलताना कोणकोणत्या म्हणींचा वापर करतात त्याची यादी तयार करा.

२.प्राणी,शरीराचे अवयव यावर आधारित म्हणी शोधून त्याचा संग्रह करा.

3..म्हणीवरून एक गोष्ट तयार करा व ती तुमच्या मित्राला सांगा.

४.म्हणी असलेल्या गोष्टींचे वाचन करा व म्हणींचा अर्थ समजून घ्या.

SCERT MAHARASHTRA

३७

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता - लेखन** **संकल्पना-वाक्प्रचार**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.08 वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.

05.01.10.भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे दोन गट करुन एका गटाकडे वाक्प्रचार व दुसऱ्या गटाकडे त्यांचे अर्थ असलेले शब्दकार्ड द्यावे.एका गटाने वाक्प्रचार सांगावा व दुसऱ्या गटाने त्याचा अर्थ सांगावा.हे पुन्हा गट बदलून करावे.

सक्षम बनू या





शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रकार्ड दाखवावे व चित्रावर आधारित वाक्प्रचार ओळखण्यास सांगावे.चित्राविषयी एक दोन वाक्ये विद्यार्थ्यांना विचारावी. शिक्षकांनी चित्रावररून वाक्प्रचाराचा अर्थ व वाक्यात उपयोग स्पष्ट करावा. आणखी चित्रकार्ड व शब्दकार्ड यांचा वापर करुन विद्यार्थ्यांकडून वाक्प्रचारांचा सराव विद्यार्थ्यांचे दोन दोन गट करून घ्यावा. वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग कसा करावा ते उदाहणे देऊन स्पष्ट करावे .

सराव करू या

शिक्षकांनी एक एक वाक्प्रचार सांगून त्याचा अर्थ व वाक्यात उपयोग वैयक्तिक व गटात करायला सांगावे .

खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.

१ निर्धार करणे २.सुगावा लागणे - ३.पाय लटलट कापणे -

४. रस असणे- - ५. फन्ना उडवणे ६. आधार देणे -

२ . पुढील वाक्यात योग्य वाक्प्रचार लिहून वाक्य पूर्ण करा.

अ) शिष्यवृत्ती परीक्षेत पहिला क्रमांक मिळविल्यामुळे सविताचे सर्वांनी .....

आ)सर्वांनी मिळून कामाचा .....

इ) मिठाई पाहताच संतोषच्या .....

ई) सखारामने आपल्या शेतात..... मुळे त्याच्या शेतात भरघोस पीक आले.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्याव्यात.

१. शरीराच्या अवयवावरुन असलेल्या वाक्प्रचारांची यादी करा.

२.तुम्हाला आवडणारी एक गोष्ट वाचा व त्यातील वाक्प्रचार शोधून त्याची यादी करा.

३ .वाक्प्रचाराचा उपयोग करुन एक गोष्ट तयार करा व आपल्या मित्र / मैत्रीणांना सांगा.

इयत्ता – पाचवी **विषय-मराठी**

३८

क्षेत्र – वाचन **संकल्पना - संवादवाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04.01.10 वाचलेल्या रचनेमधील मुख्य विषय ,घटना,चित्र,पात्र, शीर्षक यांसंबधी चर्चा करतात.प्रश्न विचारतात,आपले मत व्यक्त करतात,आपले म्हणणे पटवून देतात.

05.01.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी साहसी,सामाजिक विषयावरीलकथा ,कविता इ.)विषय घटना ,चित्र,पात्र,व शीर्षक याबाबत चर्चा करतात प्रश्न विचारतात,आपले मत देतात,तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधतात

जाणून घेऊया

केशव : बापरे ! केवढी ही गर्दी आणि किती ह्या गाड्या !

बाबा : तू आज पाहतोस होय ही गर्दी ! रोजच अशी गर्दी असते इथे .

केशव : एवढी सगळी माणसं कुठ चालली असतील बर ! ह्या सगळ्या गाड्यांना किती पेट्रोल ,डिझेल लागत असेल ?

बाबा : आणि वाहनातून निघणाऱ्या धुराचं काय ?

केशव :गर्दी,धूर,वाहनांचे आवाज ,कर्कश हॉर्न ....कधी एकदाच इथून लांब जातोय,असं झालं आहे मला

शिक्षकांनी वरील उतारा फळ्यावर सुवाच्य अक्षरात लिहून विद्यार्थ्यांना त्याचे वाचन करण्यास सांगावे .वाचन झाल्यानंतर त्यांना पुढील प्रश्न विचारावेत.

प्रश्न : १) हा संवाद कोठे झाला असेल ?

२) हा संवाद कोणाकोणामध्ये झाला ?

३)रस्त्यावर कोणत्या वेळेला जास्त गर्दी असते ? का ?

४)वाहतूक कोंडीमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात?

५)वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून काय केले पाहिजे?

६)वाहतूक कोंडीमुळे कोणकोणत्या प्रकारचे प्रदूषण वाढते?

७)प्रदूषण कमी व्हावे म्हणून काय काय करता येईल?

सक्षम बनू या

शिक्षक वरील संवादाचे आवाजातील चढ उतार ,विरामचिन्हे ,आशय लक्षात घेऊन प्रकटवाचन करतात. शिक्षक संवादाचे वरील प्रश्न उत्तराद्वारे चर्चा करतात.संवाद वाचताना आशय,आवाजातील चढ उतार ,नवीन शब्द, पात्र,संवादाचे ठिकाण याकडे लक्ष द्यावे हे स्पष्ट करतात.वरीलप्रमाणे विविध प्रकारचे संवाद मुलांना वाचनास देतात.

सराव करू या

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यास विविध प्रकारचे संवाद वाचनास उपलब्ध करून द्यावेत .

२)२..२ मुलांची जोडी लावून एकाने संवाद वाचावा व दुसऱ्याने त्या संवादावर प्रश्न विचारावेत.

कल्पक होऊ या

१)पुढील विषय घेऊन संवाद लेखन करा.

उदा. कचऱ्याची समस्या ,स्वच्छता

२)वर्गात,शाळेत किंवा परिसरात घडलेला प्रसंग

उदा. डॉक्टर व पेंशट , भाजीवाली व ग्राहक , रिक्षावाला व प्रवासी

३९

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र-भाषाभ्यास **कौशल्य/क्षमता - संभाषण,वाचन, लेखन** **संकल्पना-वचन**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.12 - भाषेतील विविध बारकावे उदा.शब्दांची पुनरावृत्ती,सर्वनाम,विशेषण,लिंग,वचन इत्यादींविषयी सजग राहून लेखन करतात.

05.01.10 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक(उदा.विरामचिन्ह,काळ,क्रियापद,लिंग,वचन)ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी फळ्यावर शब्द लिहून किंवा शब्दकार्ड दाखवून एकवचनी शब्दांचे अनेकवचन विचारावे व अनेकवचनी शब्दांचे एकवचन विचारावे . उदा.डबा,झाड,पैसे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही शब्द देऊन ते शब्द एकवचनी आहेत की अनेकवचनी ते विचारावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वस्तू दाखवून वस्तू एक आहे की अनेक ते विद्यार्थ्यांना विचारावे .शिक्षकांनी वचनाचे प्रकार स्पष्ट करावेत .एकवचनी व अनेकवचनी शब्दांतील फरक स्पष्ट करावा .उदाहरणाद्वारे एकवचनी शब्दांचे अनेकवनी शब्दांत व अनेकवचनी शब्दांचे एकवचनी शब्दांत रुपांतर विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे .

शिक्षकांनी एकवचनी व अनेकवचनी शब्दानुसार वाक्याच्या क्रियापदात होणारा बदल समजावून सांगावा .उदा.मी आंबा खाल्ला .मी आंबे खाल्ले .

सराव करू या

शिक्षकांनी पुढील कृती द्वारे विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा.

१.पुढील शब्दांच्या गटातून एकवचनी व अनेकवचनी शब्द ओळखा व लिहा.

उदा.घर, रांगा, दरवाजे, रस्ता,पुस्तके, नदी इ.

२.शिक्षक काही शब्दांचे एकवचन व अनेकवचन विचारून किंवा लिहायला सांगून सराव घेतील.

उदा. पिशवी, फरशी ,चांदण्या, डोके ,डोळा ,पेढे,पाने इ.

३.पुढील वाक्यात योग्य वचनाचे नाम लिहून वाक्य पूर्ण करा.

अ)पठारावर रानफुलांचा ..... पसरला होता .(गालिचे गालिचा)

आ) सविताला एक ..... घेऊन दिली.(सायकली , सायकल)

४.पुढील वाक्यांमध्ये वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा व वाक्यात काय बदल होतो ते समजून घ्या.

१.सुरेशने गोष्टीचे पुस्तक वाचले.सुरेशने .....

२.आजीने देवाला फुले वाहिली. आजीने .....

कल्पक होऊ या

१.ज्या शब्दांचे वचन बदलत नाही अशा शब्दांची यादी तयार करा.

२ .पुढील शब्द लिहून वाक्य तयार करा. वाक्यातील फरक जाणून घ्या.

उदा.फळ,फळे . पुस्तक , पुस्तके इ

४०

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र-लेखन **संकल्पना-अनुभव लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.04 स्वतःचे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात.

05.01.02 आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्याबाबत लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.

जाणून घेऊ या

शिक्षक विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात येणारे निरनिराळे अनुभव व त्यावर त्यांच्या प्रतिक्रिया याविषयी प्रश्न विचारतील.

उदा.

१. तुमचा वाढदिवस कधी असतो?

२.त्या दिवशी तुम्ही काय काय करता?

३.तुमची आई तुमच्यासाठी काय बनवते? इत्यादी

वरील प्रश्नांचा संदर्भ घेवून विद्यार्थ्यांना वाढदिवस कसा साजरा केला याचे अनुभवकथन लिहिण्यास सांगतील .

सक्षम बनू या

आपल्या दैनंदिन जीवनात आलेल्या अनुभवांचे लेखन करताना कोणत्या बाबींचा विचार करावा लागेल ? वर्णन लिहिताना मुद्देसूद असावे. अनुभव लेखन भरकटत जावू नये. योग्य भाषेचा वापर असावा. अनुभव लेखनातील ठिकाणे ,वेळ ,पात्र याविषयी स्पष्टता असावी .

अशा विविध मुद्द्यांचा वापर अनुभव लेखनात करून ते प्रभावी कसे होईल याविषयी शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

'माझा शाळेतील पहिला दिवस' या विषयावर विद्यार्थ्यांना अनुभव लेखन करण्यास सांगतील . शिक्षक योग्य तेथे मार्गदर्शन करतील .

सराव करू या

शिक्षक विद्यार्थ्यांना 'शाळेची परिसर सहल' या विषयावर प्रत्येकाला अनुभव लेखन करण्यास सांगतील.

कल्पक होऊ या

1. 'कोरोनामुळे शाळेला अचानक लागलेली सुट्टी' या विषयावर तुमचे अनुभव लेखन करा.
2. तुम्हांला आत्तापर्यंत आलेल्या एखाद्या चांगल्या / वाईट अनुभवाचे लेखन करा.

३.तुमची स्वतःची रोजची दैनंदिनी लिहा.

४१

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र-लेखन **संकल्पना-निबंध लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

04.01.18 आपल्या कल्पतेनुसार गोष्ट,कविता,वर्णन इत्यादी लिहिताना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात.

05.01.14 पाठ्यपुस्तक आणि इतर लेखन प्रकारातील संवेदनशील विषयावर लिखित स्वरूपात/ब्रेल लिपीत अभिव्यक्त होतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक विषय व त्याच्याशी संबंधित मुद्दे फळ्यावर लिहून द्यावेत .प्रत्येक मुद्द्याशी संबंधित वाक्य विद्यार्थ्यांना विचारावे.सर्व वाक्यांचे एकत्रीकरण करून ७ ते ८ ओळींचा एक निबंध तयार करून विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगावे व तपासावे.

उदा. माझा आवडता प्राणी

नाव - उपयोग – वेगळेपणा –वैशिष्ट्य -अन्न

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना निबंध कशाप्रकारे लिहावा याविषयी मार्गदर्शन करावे .

निबंध लिहिताना दिलेल्या विषयाशी संबंधित आशय, भाषेचा योग्य वापर ,आलंकारीक शब्दांचा वापर कसा व कोठे करावा , निबंधाची सुरुवात व शेवट आकर्षक असावा इत्यादी बाबींवर मार्गदर्शन करावे.

विद्यार्थ्यांकडून एका निबंधाचे लेखन करून घ्यावे. शिक्षकांनी आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

उदा. स्वच्छ माझा गाव –

गावाची ओळख – गावाची वैशिष्ट्ये -गावातील कचरा व्यवस्थापन - सांडपाणी नियोजन - वैयक्तिक स्वच्छता - आरोग्याविषयी जनजागृती- शेवट

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला निबंधलेखनासाठी एक एक विषय द्यावा.गटात चर्चा करून विद्यार्थ्यांना निबंध लेखन करण्यास सांगावे .

कल्पक होऊ या

1. 'लढाई कोरोनाशी' या विषयावर तुम्ही अनुभवलेले प्रसंग ,घेतलेली काळजी या मुद्द्यांना अनुसरून निबंध लिहा.
2. 'वृक्ष माझा मित्र' या विषयावर आधारित तुमचे विचार लिहा,

४२

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- निमंत्रणपत्रिका लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

चौथी:- 1)एखाद्या विषयावर लिहिताना विशिष्ट परिस्थिती आणि उद्दिष्ट लक्षात घेऊन लेखन करतात .


2)आपल्या कल्पनेनुसार गोष्ट ,कविता ,वर्णन इत्यादी लिहिताना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात.

पाचवी:- 1)आपल्या परिसरात घटणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्याबाबत लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.

2) पाठ्यपुस्तक आणि इतर लेखन प्रकारांतील संवेदनशील विषयावर लिखित स्वरूपात /ब्रेल लिपी मध्ये अभिव्यक्त होतात .

3)आपल्या कल्पनेने कथा, कविता, पत्र इत्यादी लिहितात.

जाणून घेऊ या



जाहीर निमंत्रण

पाळंदूरमधील सर्व लोकांसाठी

दरवर्षीप्रमाणे आपल्या शाळेत, म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर येथे 'मुलांचा दिवस' या उपक्रमाअंतर्गत प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांनी बनवलेल्या विविध वस्तू व भेटकार्डे, रेखाटलेले तक्ते, मातीकाम, चित्रे आणि शाळेच्या बागेत फुलवलेल्या भाज्या व फळे यांची प्रदर्शनी भरवली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी लाखनीवरून 'विदर्भ आनंदशिक्षण मंडळा'चे कार्यकर्ते श्री. बालसू नागोटी आणि श्रीमती सुवर्णाताई गजभिये उपस्थित राहणार आहेत. ते कलाकुसरीच्या वस्तू बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील. तरी आपण सगळ्यांनी उपस्थित राहून आमचा उत्साह वाढवावा, ही विनंती.

शनिवार, दि. .....

ठिकाण
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर.

प्रदर्शनीची वेळ : सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००

प्रात्यक्षिक : सकाळी ११.३० ते दुपारी १.३०

* खास आकर्षण *
गेल्या वर्षीच्या सहलीची वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रे.

आपले
सर्व विद्यार्थी, इयत्ता चौथी
जि.प.प्रा. शाळा, पाळंदूर.

Scanned with CamScanner

शिक्षकांनी इयत्ता चौथीच्या पुस्तकातील पान क्र. 52 वरील निमंत्रण पत्रिका विद्यार्थ्यांना दाखवावी व निरीक्षण करण्यास सांगून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहायला सांगा.

1) निमंत्रण कोणकोणत्या प्रसंगी दिले जाते?

2)तुमच्या शाळेकडून तुमच्या आई-वडिलांना कोणकोणत्या प्रसंगी निमंत्रण दिले गेले आहे?

3)निमंत्रणपत्रिकेत कोणकोणते मुद्दे असतात?

4)तू वाचलेल्या निमंत्रण पत्रिका कोणकोणत्या प्रसंगाच्या होत्या ?

शिक्षकांनी वरील प्रश्नांची विद्यार्थ्यांनी लिहिलेली उत्तरे वाचून विद्यार्थ्यांना निमंत्रणपत्रिका काय व कशासाठी असते,कधी तयार केली जाते,त्यातील महत्वाचे व अनिवार्य मुद्दे कोणते याबाबतीत विद्यार्थ्यांना कितपत माहिती आहे जे जाणून घेतील.

सक्षम बनू या

शिक्षकांनी लग्नपत्रिका,वाढदिवस,उद्घाटन समारंभ,स्नेहसंमेलन, प्रदर्शने,प्रकाशन समारंभ अशा विविध प्रसंगांच्या निमंत्रण पत्रिका मुलांना दाखवाव्यात/द्याव्यात व खालील मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

1)लग्नपत्रिकेमध्ये व सर्व निमंत्रण पत्रिकांमध्ये नमूद केलेले व अत्यावश्यक असलेले मुद्दे विद्यार्थ्यांना सांगावे.

2)उद्घाटन समारंभाची पत्रिका आकर्षक होण्यासाठी काय काय केले आहे हे विद्यार्थ्यांना सांगावे.

3)प्रमुख पाहुणे यांचा उल्लेख कोणकोणत्या निमंत्रण पत्रिकेत आवश्यक असतो हे सांगावे

4)निमंत्रण पत्रिकेतील वाक्यांची रचना,वाक्यातील शब्दांची मर्यादा, आकर्षकपणा येण्यासाठी वापरावयाची रंगसंगती कागद,सजावट याबाबतीत विद्यार्थ्यांना सूचना सांगाव्यात.

सराव करू या

शिक्षकांनी पुढील विषयावर विद्यार्थ्यांना निमंत्रण पत्रिका लिहायला सांगावी.

पर्यावरण दिनानिमित्त तुम्ही मित्र गावात वृक्षारोपणाचा कार्यक्रम करणार आहात त्यासाठी गावातील व्यक्तींना निमंत्रित करणारी निमंत्रण पत्रिका लिहा.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी निमंत्रण पत्रिकेबाबात पुढील कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी.

1)कागदाचा वापर न करता व जलद वेळेत सर्वांपर्यंत निमंत्रण पत्रिका पोहचण्यासाठी काय कराल हे विद्यार्थ्यांना लिहायला सांगतील.ही पत्रिका पोहचविण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर कराल हे विद्यार्थ्यांना लिहायला सांगतील.

2) गावातील 'अभ्यासमालेचे उद्घाटन' या विषयावर वरीलप्रमाणे निमंत्रण पत्रिका उपलब्ध आसलेल्या कागदावर विद्यार्थ्यांना तयार करायला सांगतील व वरीलपैकी विविध साधनांचा वापर करून मुलांच्या मित्र, गावातील ग्रामस्थ व शिक्षका व नातेवाईक यांना पाठवायला सांगतील..

SCERT MA

४३

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- संवादलेखन**

अध्ययन निष्पत्ती-

चौथी:- 1)विशिष्ट परिस्थिती आणि उद्दिष्ट लक्षात घेऊन लेखन करतात .

2)आपल्या कल्पनेनुसार गोष्ट ,कविता, वर्णन इत्यादी लिहिताना भाषेचा सर्जनशीलतीने वापर करतात.

पाचवी:-1) आपल्या कल्पनेने कथा ,कविता, पत्र इत्यादी लिहितात.कथा ,कविता यांमध्ये स्वतःच्या शब्दांची भर घालून लेखन करतात.

2)आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांबाबत लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पुढील संवाद फळ्यावर लिहावा व विद्यार्थ्यांना वाचायला लावावा.

(पुढील सूचना मुलांना द्यावी)

अ)पुढे काही मित्रांमधील बोलणे दिलेले आहे ते वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.

इशरत:-" परवा आमच्या पाड्यावर आमच्या घरी रमजानच्या सणाला सर्वांनी यायचं हं!"

विनीत:- "हो नक्की येणार ,चाचा आणि चाची यांचीही त्यानिमित्ताने भेट होईल"

जॉन:-" मी येणार व माझ्या बहिणीला म्हणजे ज्यूलीला पण घेऊन येणार चालेल ना? "

इशरत:-"हो चालेल ना जॉन"

विनीत:-"जॉन पण तुला एकच वाटी शिरखुर्मा देणार आहे ती."

इशरत:-असं एकच वाटी वगैरे काही नाही रे.सर्वांनी मंगळवारी ईदला नक्की या. अम्मी भरपूर शिरखुर्मा करणार आहे.

1)वरील संवाद किती व्यक्तींमध्ये घडला आहे?

2)वरील संवादात प्रश्न कोणी विचारला आहे?

3)इशरतच्या घरी किती जण जाणार आहेत? त्यांची नावे लिहा.

4) हा संवाद कोणत्या वारी घडलेला असेल?

वरील प्रश्नांच्या आधारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संवाद कितपत समजला हे जाणून व्हावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी संवाद कसा लिहायचा याबाबतीत विद्यार्थ्यांना पुढील मुद्द्यांच्या आधारे मार्गदर्शन करावे.

1)संवादात दोन किंवा अधिक व्यक्ती सामील असतात.

2)संवादातील वाक्ये दुहेरी अवतरणचिन्हात लिहिली जातात.

3)संवाद म्हणजे एखाद्या विषयावर एकमेकांशी बोलणे असते.

4)संवाद अधिक प्रभावीपणे होण्यासाठी पात्रांची संख्या कमी असावी.

5)संवादासाठी एक निश्चित विषय निवडावा व त्यावर आधारित पात्रांचे बोलणे असावे.

6)संवादात सलगता असावी.

7)वाक्ये जास्त मोठी नसावीत.

8)संवाद अधिक प्रभावीपणे होण्यासाठी वाक्यरचना सुटसुटीत असावी.योग्य ठिकाणी अवतरणचिन्हे वापरावीत.

शिक्षकानी वरीलप्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यानंतर पुढील विषयाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना संवाद लिहायला सांगावा.

सराव करू या	कल्पक होऊ या
शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील विषयावर संवाद लिहायला सांगावा. 1) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांडे, ता. भोर ,जि. पुणे येथील विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेच्या सहलीचे नियोजन करावयाचे आहे.शाळेतील 4 ते 5 वर्गप्रतिनिधी यांच्यात काय संवाद घडेल तो विद्यार्थ्यांना लिहायला सांगावा. 2) बाजारात भाजीपाला आणायला तुम्ही गेला आहात अशी कल्पना करा भाजीविक्रेते व तुमच्यामध्ये काय संवाद होईल ते लिहा.	शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्यावी. 1))शाळेच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे नियोजन करावयाचे आहे.शाळेतील 4 ते 5 वर्गाप्रतिनिधी यांच्यात काय संवाद घडेल हे तू लिहा. (या संवादात पुढील मुद्द्यांचा समावेश करा.) (स्नेहसंमेलन कधी घ्यावे? त्यासाठी किती खर्च येईल? प्रमुख पाहुणे कोण?स्वागत ,बक्षिसे यासाठी प्रायोजक , कोणकोणते कार्यक्रम आयोजित करावेत?) 2)शिक्षकांनी तीन विद्यार्थ्यांना पुढे बोलवावे, एकाच्या हातात खोडरबर, दुसऱ्याच्या हातात पेन्सिल व तिसऱ्याच्या हातात कागद द्यावा.कागद व पेन्सिल या पात्राच्या ठिकाणी मुलांना स्वतः ला मानायला/कल्पना करायला सांगून तिघे एकमेकांशी संवाद साधायला सांगतील याबाबत संवाद सादरीकरण करायला सांगावे व तो संवाद सर्व विद्यार्थ्यांना नंतर लिहायला सांगावा.

SCERT MAHARASHTRA

४४

इयत्ता- पाचवी **विषय-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- कल्पनाविस्तार**

अध्ययन निष्पत्ती-

चौथी :- 1)स्वतःच्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखनप्रक्रिया समजून घेतात, स्वतःचे लेखन तपासून घेतात, लेखनाची उद्दिष्टे आणि वाचक यानुसार त्यात बदल करतात.

2) विशिष्ट परिस्थिती आणि उद्दिष्ट लक्षात घेऊन लेखन करतात.

पाचवी:- .पाठ्यपुस्तक आणि इतर लेखनप्रकारांतील विषयावर लिखित स्वरूपात /ब्रेल लिपीमध्ये अभिव्यक्त होतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एखाद्या घटनेबाबतच्या कल्पनेबाबत विद्यार्थी किती व कशाप्रकारे विचार करतात/कल्पना करतात व लिहितात हे जाणण्यासाठी पुढील कृती द्यावी.

शिक्षक विद्यार्थ्यांना पुढील प्रसंगी विद्यार्थ्यांना काय वाटेल ते 2 ते 3 वाक्यांत लिहिण्यास सांगतात.

1)आजारी व्यक्तीला पाहून

2)बाजारात फिरताना

3)क्रिकेट खेळताना चेंडू हरवला तर

4)हिरवागार निसर्ग पाहून

5)गोष्टींची पुस्तके दिसली तर

(विद्यार्थ्यांनी लिहिलेली वाक्ये पाहून एखाद्या घटनेबाबत विद्यार्थ्यांना कशाप्रकारे कल्पना करता येते व लिहिता येते हे शिक्षकांनी जाणून घ्यावे.)

सक्षम बनू या

शिक्षक विद्यार्थ्यांना - विद्यार्थी एखाद्या घटनेबाबत कल्पना करण्यासाठी व लिहिण्यासाठी पुढील मुद्दे महत्त्वाचे सांगतील.

अ)स्वतः त्या घटनेत तुम्ही सहभागी आहात ही कल्पना करून मनात विचार आणणे/ करणे.

ब)ती घटना स्वतः अनुभवत आहात वा अनुभवली आहे हा विचार मनात आणणे.

क) ती घटना डोळ्यासमोर आणणे.

ड) त्या घटनेतील पात्राशी जुळवून घेत त्या पात्रातील नायक आपण स्वतः आहोत हा विचार करून कल्पना करणे.

ई) घटना आपल्या परिसरातच घडते हा विचार करणे.

शिक्षकांनी वरीलप्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. पुढील विषयांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना कल्पना सांगावी.

शिक्षक स्वतः "मी विद्यार्थी झालो" तर या विषयावर कल्पनाविस्तार करून सांगतील.

एका एका गटाला विषय देऊन चर्चा घडवून आणण्यास मदत करतील व गटातील एकाला सादरीकरण करण्याची संधी देतील.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील विषयावर कल्पना करण्यास सांगावी व ती लिहिण्यास सांगावी.

कोरोना संपल्यावर शाळा सुरू झाली तर काय काय होईल हे लिही

कल्पक होऊ या

अचानक एखादी रोगाची साथ आली तर ? याविषयी लिही.

अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी व सरपंच यांची मते जाणून घेऊन काय करावे लागेल याविषयी लिही.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

४५

सेतु अभ्यास चाचणी क्रमांक -३

विषय – मराठी

इयत्ता- पाचवी

विद्यार्थ्याचे नाव : -

एकूण गुण : २०

प्रश्न १) जाहिरातीचे जाहिरात देणाऱ्याला कोणते फायदे होतात?कोणतेही दोन फायदे लिहा? (२ गुण)

प्रश्न २) खालील शब्दातील मूळ रूपातील क्रियापदे कोणती ते शोध व लिही. (२गुण)

अ) झोपणे ब) वाचून क) वाचणे ड)खाल्ल्यावर ई)खेळून फ) पडणे ग)खेळणे

प्रश्न ३)प्राणी संग्रहालयात प्रवेश करताना कोणत्या सूचना असाव्यात?कोणत्याही दोन सूचना लिही. (२ गुण)

प्रश्न ४) ' मन ' या शब्दाचे भिन्न अर्थ असणारे प्रत्येकी एक वाक्य लिहा. (२ गुण)

प्रश्न ५) ' कार ' हा प्रत्यय लावून चार नवीन शब्द तयार करा व लिहा. (२ गुण)

प्रश्न ६)पु ढील वाक्य वाच व अधोरेखित शब्दाचा समानार्थी शब्द लिही व शब्दासह वाक्यात योग्य तो बदल करून वाक्य परत लिही. (२ गुण)

नीलमला तिच्या मैत्रिणीला मदत करता न आल्याचा **खेद** वाटला.

प्रश्न ७)'डोळे भरून येणे' या वाकप्रचाराचा योग्य अर्थ कोणता? (२ गुण)

अ)डोळे दुखणे

ब) रडू येणे

क)अपमान वाटणे

ड)सुरुवात होणे

प्रश्न ८) किरणने आंबा सीताफळ केळी द्राक्षे खाल्ली गणेश तू किरण बरोबर होतास तू काय काय खाल्ले वरील वाक्य विरामचिन्हासह परत लिहा. (२ गुण)

प्रश्न ९) कोणतीही चार विरामाचिन्ह काढ व त्यांच्यापुढे त्यांची नावे लिही. (२ गुण)

प्रश्न १०) निकीताने आंबे खाल्ले. या वाक्यावर आधारित 2 प्रश्न तयार कर. (२ गुण)

SCERT MAHARASHTRA PUNE